# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०६/१२/२००७

लालबहादुर शास्त्री स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला,
दि. ०६/१२/२००७

आज दि. ०६/१२/२००७ रोजी स्थायी समितीची सभा सुचना क्र. ०२ दि. ०१/१२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरिल विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता लाल बहादुर शास्त्री, स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे सकाळी ११.०० आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ८) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ९) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| १०) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ११) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १२) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १३) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १४) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १५) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

मी उशीरा आल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. याच्या पुढच्या मिटींगला कधीही उशीर होणार नाही. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम असल्याने तिथे जाणे भाग होते. तरी त्यामुळे उशिर झाला. सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सदस्या, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग ह्या सर्वांचे स्वागत करतो आणि सचिवांनी सभेचे कामकाज सुरु करावे असा आदेश देतो.

(नगरसचिवानी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. सचिव साहेब, ह्यापूढे आपण सभा ठेवताना असे कोणतेही कार्यक्रम असतील त्या दिवशी सभा ठेवू नये. कारण अशा जयंती किंवा सुवर्ण महोत्सव असल्यास असा घोळ होतो. म्हणून सभा ठेवताना अशा दिवशी ठेवू नये अशी मी विनंती करतो.

**मा. सभापती :-**

मागच्या पंधरा दिवसापासून सभा नव्हती म्हणून आता ही सभा घेतली.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ०२ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०२ :- दि. २०/०६/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, स्थायीमध्ये सभा सुरु होण्यापूर्वी सभा संपेपर्यंत किती सदस्य अपेक्षीत आहेत. त्याची माहिती द्या.

**नगरसचिव :-**

सभेचा कोरम पाच आहे आणि शेवटपर्यंत पाच जरी राहिले तरी सभा सुरु राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. नगरसचिव, पहिल्या पानामध्ये सन्मा.सदस्या सौ. ज्युडी डिसोझा ह्यांचे म्हणणे आहे की, आम्हाला ह्यामध्ये काहीही दिलेले नाही.

**एस. ए. खान :-**

याचा अर्थ काय?

**मिलन म्हात्रे :-**

ते काय आहे ते बघा. नाहीतर ते वाक्य इतिवृत्तांतामधून काढून टाका.

**नगरसचिव :-**

त्यांचे अगोदर असे वाक्य आहे की, साहेब ह्यामध्ये श्री. मोहन पाटील ह्यांनी महाराष्ट्र प्रदेश चिटणीस पदी नियुक्ती झाली आहे. त्यामध्ये ह्यांचेपण नाव घेतले तर बरे होईल. आम्हाला ह्याच्यात काहीच दिलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पण ते कशाबद्दल आहे त्याचा बोध होत नाही.

**नगरसचिव :-**

त्यांचे जे वाक्य आहे तसेच घेतले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना त्यांचे अधिकार मिळालेले नाहीत का? किंवा त्यांची कामे पेन्डीग राहिली आहेत का? हा बोध होत नाही. ते वाक्य काढून टाका आणि त्याच्यामध्ये एकीकडे आपण अभिनंदन ठराव क्र. ६५ (अ) बोलले आहात. पान क्र. २ वर आहे बघा. आत्ता हे पहिले पान आहे. याच्यामधल्या तुमचा ठराव क्र. ६५(अ) च्या वर ठराव क्र. ६५ कुठे आहे. जेव्हा क्लबींग होते १(अ) तेव्हा एक आम्हाला माहित पडले पाहिजे. कारण दोन्ही ठरावाचे जेव्हा आपण अ, ब, क असे डिव्हायडेशन करता, तेव्हा त्याला मुळ ठराव पहिला कारणीभूत असतो. त्याला जोडून ते असते. जसे, ठरावाची उपसुचना ठराव क्र. ६५ कुठे आहे?

**नगरसचिव :-**

मागच्या बॉडीचा ठराव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तो कुठे आहे? त्याचे क्लबींग याला आले.

**नगरसचिव :-**

अभिनंदन ठरावाचा नंबर वेगळा आहे. हा अभिनंदनाचा ठराव आहे. ठराव क्र. ६५ वेगळा आहे. त्याची कॉपी तुम्हाला दाखवतो.

**मिलन म्हात्रे :-**

ती आली पाहिजे.

**एस. ए. खान :-**

साहेब, ती द्यायला पाहिजे.

**नगरसचिव :-**

ते या इतिवृत्तांतामधील नाही. मागच्या इतिवृत्तांतामधले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अभिनंदनाच्या ठरावाला वेगळा नंबर पडतो का?

**नगरसचिव :-**

ठराव क्र. ६५ आहे. तो दुसऱ्या इतिवृत्तांताधील आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव क्र. ६५, ज्याचा सन्मा. सदस्य श्री मिलन म्हात्रे ह्यांनी उल्लेख केला. तो ठराव क्र. ६५ इकडे आला पाहिजे. कारण ते ठराव को-ऑर्डीनेशन असेल.

**नगरसचिव :-**

को-ऑर्डीनेशन नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग तुम्ही 'अ' कशाला दिला?

**नगरसचिव :-**

ठरावाला नंबर नव्हता आणि अभिनंदन ठराव नंतर आला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही त्याला ६६ द्या.

**मिलन म्हात्रे :-**

ज्यावेळेस तुम्ही ६५ चा रेफरन्स देता त्यावेळी विषयपत्रिकेवर प्रकरण क्रमांकानंतर तो ठराव कंटीन्युमध्ये आला पाहिजे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यामध्ये नगरसचिवांनी जो ठराव क्र. ६५ (अ) टाकलेला आहे. तो जो ठरावाला सिरिअल नंबर दिलेला आहे. त्या सिरिअल नंबरमध्ये जे पुढचे ठराव झालेले आहेत. त्याच्यामध्ये नंबर चेंज होउ नये म्हणून त्यांनी तो ऑब्लिग नंबर दिलेला आहे. पहिल्या ठरावाचा ह्या ठरावाशी काही संबंध नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या माहितीकरिता तो पाहिजे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दॅट इज द फॅक्ट.

**नगरसचिव :-**

६५ चा ठराव देतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हा जर तरचा विषय नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझ्या माहितीप्रमाणे ६५ चा विषय शेवटच्या मिटींगमध्ये झालेला आहे. कारण त्याची प्रोसिडींग मी घेतलेली आहे. मग तो याच्यात का आला नाही? तो इतिवृत्तांताला आला पाहिजे होता. ६५ चा ठराव याच सभेमध्ये झालेला आहे.

**नगरसचिव :-**

नंबर कंटीन्यु होउ नये म्हणून केलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इतिवृत्तांतामध्ये तो आला पाहिजे. तो ह्याच सभेत होता.

**नगरसचिव :-**

मागच्या सभेत होता.

**मिलन म्हात्रे :-**

तो असेल नसेल. तुम्ही जेव्हा एखाद्या ठरावाचा अर्धा पार्ट इकडे लावून देता. तेव्हा आमची एक विनंती आहे की, तुम्ही आम्हाला ते द्यावे.

**नगरसचिव :-**

तुम्हाला देतो.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. १० प्रकरण क्र. ७३ एकूण १,२,३,४,५ पाच मिटींगचा ठराव आहे. आणि हाच ठराव तुम्ही ह्याच्यामध्ये घेतलेला आहे. अमुक अमुक १८/०५, २४/०५, ३०/०५, ०५/०६ आणि १५/०६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेमध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह आणि सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे. आता या इतिवृत्तांताला आम्ही मंजुरी द्यायची. त्या पुढच्या पाच-सहा मिटींगमध्ये काय झाले ते आम्हाला काही माहित नाही. हे सगळे ठराव एकदा याला मंजुरी मिळाली की, पटापट पेमेंट वगैरे सुरु होणार आणि आमच्या ह्या सभेचा रेफरन्स देवून तुम्ही व्यवहार सगळे उरकणार. त्याकरिता हा जो विषय आहे. त्याला आमचे ऑब्जेक्शन आहे. आणि ह्या इतिवृत्तांतामध्ये पूर्ण इतिवृत्तांत, पुढे भरपूर प्रकरणे येतील आणि ह्याच्यामध्ये पाच-सहा मिटींगची जिम्मेदारी आम्ही घेणार नाही.

**नगरसचिव :-**

जे ठराव आहेत ते मागच्या बॉडीचे इतिवृत्तांत आहेत. ते त्यांनी मंजुर केलेले आहेत. हा ठराव इकडे आहे. इतिवृत्तांत ऑलरेडी त्या बॉडीने मंजुर केलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्या बॉडीने जरी ठराव मंजुर केला तरी त्या मंजुर ठरावाला इतिवृत्तांताची मंजुरी नसते. तिथंपर्यंत कामकाज होत नाही. हे बरोबर आहे ना?

**नगरसचिव :-**

हे इतिवृत्तांत मंजुर झाले.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नगरसचिव साहेब, त्यांचे म्हणणे बरोबर आहे. या ठरावाशी त्यांचा काहीही संबंध नाही. ते ऑलरेडी झालेले आहे.

**नगरसचिव :-**

या इतिवृत्तांतातील ठराव कसा वगळणार?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वगळता येत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज तुम्ही २०/०६ चे इतिवृत्तांत आम्हाला दिले आणि इकडे १८/०५, २४/०५ चा उल्लेख करता.

**मिलन म्हात्रे :-**

त्या बिझनेसशी आमचा काहीही संबंध नाही.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांना मी मुद्दा क्लिअर करतो. ज्या सभेचे इतिवृत्त आपण कायम करतो त्या सभेमध्ये कायम केले आहे. म्हणून ते प्रोसिडींगला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला ते ठराव तरी दाखवा. ह्या इतिवृत्तांताला तुम्ही आमचे मंजुरी मागता.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही या इतिवृत्तांताला मंजुरी देत नाही. त्या इतिवृत्तांमध्ये झालेले कामकाज आहे.

**नगरसचिव :-**

ते इतिवृत्त ऑलरेडी दिलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही बोलता हे ऐकायला बरे वाटते. हे कशासाठी आणले? आजचा विषय कशासाठी आणला?

**नगरसचिव :-**

त्यावेळेस जे इतिवृत्त झाले ते फक्त मंजुरीसाठी आणले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे या पानामध्ये तुम्ही दोन लाईन बोलले तर वाढवणार आहात?

**नगरसचिव :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

नाही ना. तुम्ही आहे तेच मंजुरी घेता ना? म्हणून सांगतो या पानामध्ये हे जे आहे ते वगळा. बाकीची मंजुरी द्या. याला आम्ही मंजुरी देणार नाही. मंजुरी पाहिजे असेल तर त्यात काय झाले .....

**नगरसचिव :-**

या ठरावाला मंजुरी नाही. या इतिवृतांताला मंजुरी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

इतिवृत्तांताला मागितली आहे.

**नगरसचिव :-**

हे आता जे इतिवृत्तांत आहे. त्याच्यात हा ठराव आहे. ऑलरेडी मागच्या बॉडीने ह्या तारखेला इतिवृत्तांत मंजुर केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणूनच बोलतो. त्यावेळेला जे ठराव झाले आहे मग ते तुम्ही कशाला आणले? ते आणू नका.

**नगरसचिव :-**

मग मागच्या वेळेचे इतिवृत्तांत आणायचे नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

आणले आहेत ना. मग आम्हाला काय झाले आहे ते ठराव द्या ते प्रोसीडींग पुढे पाहिजे. जी तारीख टाकली ते आम्हाला पाहिजे.

**नगरसचिव :-**

तुम्ही ठराव बघा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही या पानानुसार आमची मंजुरी मागीतली आहे. आम्ही तुम्हाला त्वरीत मंजुरी देउन टाकू.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांना मी खुलासा करु इच्छितो. कोणत्याही सभेच्या कामकाजामध्ये मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी पहिला विषय असतो. या सभेमध्येसुध्दा दि. २०/०६/२००७ च्या स्थायी समिती सभेचे, जसे आज इथे ठेवलेले आहे, तसेच त्याच्यापूर्वी जे कामकाज झाले होते. त्या सभेत ठेवले होते. आणि त्यावेळेचे सभेने त्याला अंतिम केले होते. तर त्या प्रोसेडींगमध्ये ते लिहलेले असेल. तर ते कामकाज ऑलरेडी दि. २०/०६/२००७ च्या सभेमध्ये अंतिम झालेले आहे. त्यामुळे तुम्हाला त्या ठरावाची कॉपी लागत असेल तर दिली जाईल. पण त्याच्याबद्दल परत कायम करण्याचा विषय राहण्याचा संबंध नाही. दि. २०/०६/२००७ च्या सभेत त्या वेळेला मा. स्थायी समितीने दि. २०/०६/२००७ पूर्वी झालेल्या मा. स्थायी समितीचे कामकाज ज्या ठराव क्र. ६६ मध्ये कायम केलेले आहे. आपण जे

पान क्र. १० वर बोलता, ते ऑलरेडी त्या सभेने दि. २०/०६/२००७ ला कायम केलेले आहे. आणि त्या सभेतील काही सन्मा. सदस्य या ठिकाणी उपस्थित आहेत. तो कामकाजातील विषय आहे. त्याला परत दुबारा कायम करण्याची गरज नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग कशाला आणले? तुम्ही आणले म्हणून बोललो. आम्हाला त्यांनी सांगायची गरज नाही. त्या मिटींगमध्ये आम्ही नव्हतो. जे असतील ते असतील. मी श्री. मिलन म्हात्रे त्या मिटींगला नव्हतो. माझी मंजुरी पाहिजे असेल तर जे काही असेल ते आमच्यासमोर ठेवा. आम्ही मंजुरी देवू. नसेल तर आम्ही मंजुरी देणार नाही. विषय संपला. तुम्हाला जसे समजायचे तसे समजा. आम्हाला जसे समजायचे तसे आम्ही समजतो. त्यांनी जे समजावून सांगितले त्याच्यामध्ये सहा ते सात महिन्याचा कालावधी गेला आहे. त्या मिटींगला मी असतो तर गोष्ट निराळी होती. आत्ता ही बॉडी निराळी आहे. मा. सभापती निराळे आहेत. मा. सभापती त्या सभेला होते, नव्हते हा भाग निराळा आहे. पुढच्या मिटींगला मी बोलणार नाही. कारण या मिटींगमध्ये मी हजर होतो. आणि सदस्य असताना मी गैरहजर आहे ती माझी जबाबदारी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मला एक सांगा २०/०६ चे इतिवृत्तांत कायम करणे. २०/०६ च्या आधी कुठली मिटींग झाली, १८/०५ त्याच्या आधी २४/०५, २०/०५ आणि ०५/०६ आणि १५/०६ त्याच्यानंतरची सभा झाली. तर २०/०६ च्या सभेमध्ये हे सर्व कायम झाले. मग याच्यात उल्लेख करायची काय गरज आहे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२०/०६ च्या सभेत ते इतिवृत्त कायम झाले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग याच्यात तसा उल्लेख करा ना.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२०/०६ च्या सभेमध्ये ते कायम केलेले आहे. मग ते या प्रोसेडिंगमध्ये राहणारच. याला मान्यता द्या असे बोलत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माझा मुद्दा काय तो पुन्हा एकदा समजून घ्या. विषयाला वाकडे वळण देवू नका. या पानावर तुम्ही आमची मंजुरी मागितली. आम्ही तुम्हाला कुठली मंजुरी देणार? ज्याची आम्हाला माहिती आहे. आम्ही ती प्रोसेडिंग वाचतो. त्याच्यामध्ये तुम्ही पाच मिटींगचे प्रोसिडींग आणले हीच बाब चुकीची आहे. तुम्ही म्हणता शेवटच्या पाच मिटींग प्रशासनाने घाई केली पाहिजे की, आता हाउस संपायची वेळ आली आहे. तुम्ही पूर्ण एप्रिल, मे प्रोसिडींग इथे आणून तुम्ही परत मागवता. आमचे एकच म्हणणे आहे की, त्या पाच मिटींगमध्ये शेवटचा कालावधी होता. त्या सभेमध्ये आम्ही नव्हतो. आत्ता आम्ही नवीन आहोत आणि योगायोगाने समजा हा विषय आला तर त्याची आम्हाला माहिती तरी द्या.

**नगरसचिव :-**

ठराव पाहिजे तर ठराव देतो.

**मिलन म्हात्रे :-**

मग लावून द्या.

**नगरसचिव :-**

मग हे इतिवृत्तांत कायम करणार नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

त्या इतिवृत्तांताला आम्ही चॅलेंज करत नाही. पण ज्यावेळेला आमच्या मंजुरीला आला. त्यावेळेला हा प्रश्न उपस्थित होतो की, त्यावेळेच्या सदस्यांनी फार चांगले केले. आम्ही याला मंजुरी देतो. आम्ही हे वाचले आहे आणि बघितले आहे. आता या गोष्टी आम्हाला माहिती नाही.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आज सभेमध्ये तुम्ही जसे २०/०६ च्या इतिवृत्ताबद्दल चर्चा करता त्यावेळेच्या २०/०६ च्या सभेमध्ये मागील इतिवृत्तांबद्दल अशीच चर्चा होउन ते कायम झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मग, परत त्याच्यावर चर्चा करण्याचा काय प्रश्न येतो?

**मिलन म्हात्रे :-**

काहीच नाही. म्हणुन सांगतो हा विषय तुम्ही आणायला पाहिजे नव्हता.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

विषय असा नाही. म्हणजे प्रोसिंडिंगमध्ये तो भाग राहणारच आज जे कायम करतो ते पुढच्या सभेला येणारच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणुन मी बोलतो आम्हाला सगळी माहिती द्या. आणि मग करा.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

माहिती तुम्ही कधीही बघु शकता. मा. नगरसचिव साहेब, यांना जी माहिती नगरसचिव साहेब यांनी जी माहिती पाहिजे ती द्या.

**मिलन म्हात्रे :-**

याल माझे स्वतःचे ऑब्जेक्शन घ्या. तुम्ही दाखवलेले नाही. मी रेकॉर्डवर आणलेले आहे. आणि प्रोसिडींग पुढे सुरु करा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. नगरसचिव साहेब, आपण पाच-पाच मिटींगचे इतिवृत्तांत एकदम मंजुरीला का आणता? आज मिटींग झाली की, त्याचे इतिवृत्तांत पुढच्या मिटींगला आले पाहिजे. पाच-पाच सभेचे इतिवृत्तांत एकदम मंजुरीला कसे आले? तुम्ही एक पध्दत ठेवा.

**शरद पाटील :-**

मा. नगरसचिव, सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी जे सांगितले. त्याच्यात याची जबाबदारी आम्हीसुध्दा घेणार नाही. त्यांचा एकट्याचाच विरोध आहे असे नाही. आमचासुध्दा विरोध आहे. आम्हीपण त्याची जबाबदारी घेणार नाही.

**नगरसचिव :-**

ह्या बॉडीचे शेवटचे इतिवृत्तांत असेल ते पुढच्या बॉडीला येणार.

**मिलन म्हात्रे :-**

ते त्यांनी बघावे.

**शरद पाटील :-**

ते त्यांनी बघावे. त्यांना तुम्ही इतिवृत्त द्यायचे.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, जे नवीन सदस्य आहेत त्यांना त्याच्याबद्दल माहिती नाही. ते तुम्हाला विचारणार.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मी तुम्हाला एक उदाहरण देतो. विरारमध्ये सगळी अप्सुल्युट सिंगल बॉडी मेजोरीटी आहे. विरोध होत नाही, बातम्या येत नाहीत. लोकशाही चांगली आहे. समजा त्यांनी ही इमारत विकायचा ठराव मागच्या प्रोसिडींगमध्ये केला. नंतर सत्ता बदलली, दुस-याची सत्ता आली. त्यांनी केलेल्या पापांना आम्ही का भागी रहायचे? ते काय आहे ते आम्हाला कळू तर द्या.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कृपा करुन आपण गैरसमज करुन घेउ नका. ह्या पापाचा वगैरे हा विषय नाही. जे कामकाज त्या सभेने कायम केलेले आहे. त्या कामकाजावर चर्चा करण्याची काही हक्क नाही. तुम्ही तिथे विषयांतर करता.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हा विषय इकडे आला नसता तर मी बोललो नसतो.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी अजुनही बोलतो, तुम्ही मुद्दा समजून घ्यायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

समजून घेणार नाही.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही असे बोलू नका की, आम्हाला बोलायला हक्क नाही. तुम्ही तुमचे शब्द मागे घ्या की, आम्हाला हक्क नाही. तुम्ही हा विषय मिटींगला आणू नका.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हा विषय मिटींगला आणलेलाच नाही. हा विषय २०/०६ चा आहे. जो विषय ऑलरेडी कायम झालेला आहे. त्याच्यावर चर्चा करायचा प्रश्नच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग कशाला आणला? आणायचाच नाही. आणलात तर माहिती द्या.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, ही बोलण्याची पध्दत झाली का? हक्क नाही असे तुम्ही कसे बोलता?

**एस. ए. खान :-**

त्यांच्या मनात जी शंका आहे ती मिटवण्याचा त्यांच्या हक्क आहे. मा. सभापती बोलतील.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यामध्ये पाप म्हणायचा काय हक्क आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही एक काम करा. तुम्ही आम्हाला दाखवा आणि हा विषय पुढच्या मिटींगला घ्या आणि विषय संपवून टाका.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, पुढच्या मिटींगला घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पान क्र. ११ मध्ये नामकरणाचा जो प्रस्ताव होता त्यामध्ये सन्मा. श्री. रोहिदास पाटील यांनी ठराव मांडला आहे. त्याला अनुमोदक श्री रमेश जैन झालेले आहेत. नंतर वेगळ्या पध्दतीचा ठराव पास झाला. म्हणजे तो ठराव श्री. रोहिदास पाटील यांनी मागे घेतला, मतदान झाले, काय झाले याबद्दल याच्यात काही उल्लेख नाही. त्यांनी ठराव मांडला आहे की, जेसलपार्क चौपाटीचे नांव श्री. प्रमोद महाजन द्यावे. अनुमोदन रमेश जैन. नंतर मा. सभापतींनी त्याला मंजुर केले आणि लिहीले सर्वानुमते मंजुर. आता सन्मा. श्री. रोहिदास पाटील इकडे नाहीत. त्यांनी सर्वानुमते मंजुरी दिलेली आहे की नाही हे आम्ही कसे समजायचे? जर ते ठराव मांडतात तर त्यांनी ठराव मागे घ्यायला पाहिजे होता आणि ठराव मागे घेतला तर तशी नोंद व्हायला पाहिजे होती. आणि त्यामध्ये मा. सभापतींनी सांगितले आहे की, हा विषय पेन्डीग राहू द्या. बाकीचे विषय मंजुर करा. म्हणजे नामकरणाचा विषय पेन्डीग राहिलेला आहे. ठराव झालेला आहे की, सन्मा. श्री. रोहिदास पाटील यांनी माघार घेतला याच्यापैकी कोणताही उल्लेख या प्रोसिडींगमध्ये होत नाही.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर असे पुढे दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव मंजुर झालेला आहे. पण एका बाजुला यांनी ठराव मांडलेला आहे. त्यांनी माघार घेतला असा कुठे शब्द नाही आणि मा. सभापतींची रुलिंग आहे की, हा विषय पेन्डीग राहू द्या पुढे ठराव होतो. म्हणजे शेवटी त्याचे काय झाले? त्याच्यातले खरे काय आहे?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पान क्र. १४ वर मा. सभापतीचे अंतिम रुलिंग दिलेले आहे की, स्वामी विवेकानंद ठराव मंजुर.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांनी ठराव मागे घेतला की नाही? इकडे नोंद झाली पाहिजे की नाही तेवढेच मला सांगा. त्यंनी ठराव मांडलेला आहे. ठरावामध्ये त्यांनी माघार घेतली असे आले पाहिजे. किंवा मतदान झाले पाहिजे. किंवा त्यांना हा ठराव ठेवण्याचा अधिकार नाही. कुठेतरी काहीतरी उल्लेख आला पाहिजे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. रोहिदास पाटील त्या कामकाजात कुठे आहेत? त्यांचा याच्यात कुठेही आक्षेप नाही.

**शरद पाटील :-**

आता, आपण बोलतात की, गेल्या वेळेला जे सदस्य होते ते या मिटींगमध्ये आहेत. त्यांनी सांगितले की, मतदान झाले होते. मग मतदान झाल्यानंतर ठराव सर्वानमते मंजुर कसा होईल?

**नगरसचिव :-**

सन्मा. श्री. रोहिदास पाटील यांचे पान क्र. १३ वर वाक्य आहे की, तुम्हाला द्यायचे ते नाव द्या.

**शरद पाटील :-**

बरोबर आहे. पण याला मतदान झाले होते असे म्हणतात.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मतदान झाले नाही ते सर्वानुमतेच झाले.

**शरद पाटील :-**

सर्वानुमते असा त्याच्यात उल्लेख नाही. बहुमताने झाला असेल. सर्वानुमते कसा होईल? मा. सभापती साहेब, मतदान झाले तर ते सर्वानुमते होउच शकत नाही.

**नगरसचिव :-**

मतदान झाले नाही. त्यांनी सांगितले आहे की, तुम्ही निर्णय घ्या.

**शरद पाटील :-**

तुम्ही निर्णय घ्या म्हणजे सर्वानुमते झाले नाही.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी सांगितले आहे की, तुम्ही निर्णय घ्या. त्यांनी याच्यावर विरोध केलेला नाही.

**शरद पाटील :-**

ते सुधारणा करुन बहुमताने घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. १४, प्रकरण क्र. ७४, रस्ते, चौकांना नावे देण्याबाबत विचारविनिमय करणे. ठराव क्र. ६७ ही लिस्ट आली. नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७५ चे वाचन केले आणि सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. ७५ च्या ठरावाचे वाचन केले. पान क्र. १५  सचिव साहेब, तुम्ही जर प्रकरण क्र. ७५ चे वाचन केले तर त्या प्रोसिडींगला आले पाहिजे ना. शब्द न् शब्द या प्रोसिडींगला आला पाहिजे. हो, नाही, झाले, नाही झाले. आता प्रकरण क्र. ७५ चे वाचन झालेलेच नाही. डायरेक्टर श्री. रोहिदास पाटील आहेत. नगरसचिवांचे नाव नाही, त्यांचे वाचन नाही. सन्मा. सदस्य एस. ए. खान यांचे भाषण झाले. असे तुमचे म्हणणे आहे. तुमचेही स्वतःच्या वाचनाचा इकडे उल्लेख नाही.

**नगरसचिव :-**

प्रकरण ७५ चे पान क्र. १६ वर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही कामाची पध्दत बघा. पहिले तुमचे वाचन.

**नगरसचिव :-**

आम्ही ठरावाच्या वर विषय घेतो. नेहमीच्या पध्दतीप्रमाणे ठराव खाली घेतो आणि त्याच्यावर प्रकरण घेतो. तिकडे घेतलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पहिले काय होते?

**नगरसचिव :-**

पहिले वाचन होते.

**मिलन म्हात्रे :-**

मग काय आले पाहिजे? सभागृहामध्ये तुम्ही जे वाचाल ते पहिले आले पाहिजे.

**नगरसचिव :-**

आपण पध्दतीप्रमाणे घेतो.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पान क्र. १५ मध्ये तुम्ही सुरुवातीलाच नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४५ चे वाचन केले.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता हे ७५ चे वाचन काय आहे बघा?

**नगरसचिव :-**

मोर्वा भाट येथील क्रिडांगण, मुर्धा येथील नाट्यमंदिर भाड्याने देणेबाबत विचार करणे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे वाचन तुम्ही ठरावाच्या नंतर घेता का?

**नगरसचिव :-**

ठराव जिथे मांडला. त्याच्या वर आपण घेतो.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सुरुवातीलाच विषयाचे वाचन घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता वाहनाच्या केसमध्ये असेच झाले. तुमच्या आयुक्तांनी माझ्या विरोधात धडधडीत खोटे ॲफीडेविट केले. जे गंभीर परिणाम आम्हांला भोगायला लागतात ते बोलतो. तुमचे सगळे ठिक आहे. कोर्टात ही पद्धत चालत नाही. तुमचे वाचन म्हणजे वाचन. वाचन आलेच पाहिजे, त्यानंतर ठराव वाचल्यानंतर ठराव येतो. पटलावर तुम्ही वाचन करुन तो ठराव ठेवता. मग आम्ही त्याला मंजूरी करतो. मतदान करतो. तुमचे मा. उपायुक्त श्री. पाणपट्टे यांनी श्री. मिलन म्हात्रे प्रत्येक मिटींगला हजर होते आणि त्यांनी आम्हाला बेकायदेशीर वाहनांना मंजूरी दिलेली आहे. हा जोक नाही. तुमचे आयुक्त मा. हायकोर्टामध्ये ॲफिडेविटवर खोटे बोलतात. त्यावेळेला मी सभागृहात नव्हतो म्हणून मी सांगतो. त्यांनी मागच्या सगळ्या मिटींगच्या हवाला दिला. तुम्ही सर्टीफाईड कॉपी दिली. मी तुमच्याकडून काढून घेतली. प्रत्येक मिटींगमध्ये तुम्ही जे मतदान बोलतात. त्यामध्ये स्पष्टपणे म्हणा की, सोळापैकी एक श्री. मिलन म्हात्रे यांनी विरोध केला. सोळापैकी पंधराने त्याला सपोर्ट केला असे आले पाहिजे. त्या चिफ जस्टीस पुढे तुमच्या मा. उपायुक्तांनी दिलेल्या खोटया ॲफिडेवीटचे ऑपरेशन केले आणि हे सगळे ठराव नेउन दिले. त्या त्या वेळेला सदनाने ठरवलेले गाडी खरेदीचे विषय आहेत. त्याच्यात माझा एकटयाचा विरोध होता म्हणून मी बचावलो. नाहीतर मला तिकडे शिक्षा किंवा दंड झाला असता. तुमचे काही जात नाही. तुम्ही बोलाल की, टायपिंग मिस्टेक आहे, करुन घेउ. इतिवृत्तांतामध्ये थोडी मिस्टेक झाली करुन घेउ. पुढे काय? तुम्ही दिलेले इतिवृत्तांत आणि ठरावाचे मी इंग्लिशमध्ये ट्रान्सलेशन केले. आणि त्या हायकोर्टाला एक्सीबीट लागले आहे. हायकोर्टामध्ये केलेल्या केसेस अशाच जिंकल्या जात नाहीत. भरपूर कष्ट करायला लागतात. आणि हे अधिकारी कुठेही सपोर्ट करत नाहीत. स्वतःचे कातडे वाचवण्याकरिता नगरसेवकांना खोटे कसे ठरवता येईल हा विचारच अधिकारी पहिला करतो. आणि श्री. पानपट्टे यांनी ते केले. त्यांचे ॲफिडेविट माझ्याकडे आहेत. त्याच्यामध्ये ठराव झाले. आमचे मतदान झाले. कुठे विरोध, कुठे काय

त्याचे प्रोसिडींग आहे. श्री. पानपट्टे यांनी ते कोर्टाला दाखवले नाही. ही सत्य परिस्थिती आहे. आम्ही भुक्तभोगी आहोत. अधिका-यांनी पहिले सगळे चुकीचे ठराव पास करायचे. मन मानेल तसे करायचे. आणि मग परत वर टांगायची पाळी आली की, नगरसेवकाला टांगायला सगळे मोकळे त्यांनी याचे डिक्लरेशन करावे. हे प्रोसिडींग तुम्ही दरवेळेला...

**मा. सभापती :-**

तुम्ही विषयाला धरुन बोला.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेतसुद्धा हाच घोळ झाला. आणि गेली पाच वर्षे आम्ही हेच बघतो.

**मा. सभापती :-**

आत्ता तुम्ही कोर्टाचे काढता.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. सभागृहामध्ये प्रकरण वाचन झाले की तो ठराव काय आहे तो त्याच्याखाली आला पाहिजे. हे मनमानी करतील, तसे चालत नाही. त्यांनी एक्सप्लेनेशन दिले आणि त्यांनी त्याला पाठिंबा दिला. तसे होत नाही. सचिवांनी वाचन केले की, काय वाचन झाले ते द्या. त्याच्यापुढे त्यांनी ठराव तर श्री. एस.ए.खान साहेबांचे वाचन आले पाहिजे. त्याच्यानंतर मंजूर-नामंजूर.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सभापतींच्या परवानगीने माहिती देउ इच्छितो. सचिव हे सभेच्या विषयाचे वाचन करतात.

**मिलन म्हात्रे :-**

मग त्यांचे नाव आले पाहिजे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांनी ते लिहिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी आंधळा नाही. मी वाचतो आहे. त्यांनी वाचन केले आणि श्री. रोहिदास पाटील यांचे स्टेटमेंट सुरु झाले. ते वाचन गेले कुठे?

**नगरसचिव :-**

खाली एकत्र देतो.

**मिलन म्हात्रे :-**

तसे नाही. पहिले सचिवांचे वाचन त्याच्यानंतर सदस्यांनी काय कमेंटन्स केली आणि नंतर ठराव. ही पद्धत सुरु करा.

**शरद पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने विचारतो. एखादया रस्त्याचे नाव बदलायचे असेल तर त्याला काय प्रोसिजर आहे.

**मा. सभापती :-**

पहिला जो ठराव मंजूर झाला तो...

**शरद पाटील :-**

दोन ठिकाणी अशी रस्त्याची नावे बदली झाली म्हणून मी हा प्रश्न विचारला. हे प्रोसिडींगला आले पाहिजे. मी ते दोन्ही ठराव आणून दाखवेन. आणि त्यासाठी काही प्रोसिजर आहे की नाही ते मला सांगा. आपण कोणतीही नावे बदली करु शकतो का?

**नगरसचिव :-**

मिनिमम तीन महिन्यानंतर करु शकतो.

**शरद पाटील :-**

तीन महिन्यानंतर बदली करु शकतो, पण कशाप्रकारे?

**तुळशीदास म्हात्रे :-**

तीन महिने झाल्यानंतर आपल्याला अधिकार आहे की, हे नांव सभेने दिलेले आहे ते बदली करा.

**शरद पाटील :-**

पण जेव्हा तुम्ही नांव बदलता तेव्हा त्याच्यात आपण उल्लेख करतो का की, हे नाव बदली करण्यांत आलेले आहे. कुठच्याही मा. महासभेत किंवा स्टॅंण्डींगमध्ये बोला की या रस्त्याचे नाव शरद पाटील होते आणि आता खतगांवकर साहेब ठेवायचे आहे असा उल्लेख करता का? तुम्ही ते सांगता का? किंवा असेच कुठेतरी गर्दीत टाकले. कोणाला माहिती आहे, कोणाला माहिती नाही. असे काही प्रोसिजर आहे का? त्याचा उल्लेख करा. जेव्हा नांव बदली करतो तेव्हा बदली करायला पाहिजे. आपण एखादया व्यक्तिचे नाव बदली करायचे असेल तर गॅझेटमध्ये जाउन बदली करायला लागते आणि आपण इथे रस्त्याची नावे बदली करतो. उद्या तीन महिन्यानंतर आम्हांला वाटते हे नांव नको. आम्ही नाव बदली केले. नंतर तुम्ही सांगाल कसे बदली झाले त्याला काय ऑब्जेक्शन आहे. त्याच्यावर काही नियम

आहेत की नाही, हे मला सांगा. तीन तीन महिन्याने प्रत्येकजण नाव बदली करत राहिल. ते चालेल का? आपल्या महापालिकेत कोणत्याही गोष्टीची कोणत्याही अधिकाऱ्यांना माहिती नसते. कोणी नांव दिले तर ते नाव टाकायचे तिथे कोणाचे आहे हे माहिती नाही. तुम्हांला मी हे सांगतो. आपल्या अधिकाऱ्यांनाच माहिती नसते की, इथे नांव दिलेले आहे. ते बदली करुन इथे दुसरे नांव आलेले आहे. मला त्या नावाचा विरोध नाही. कोणाचे नाव आहे ते नांव आलेले आहे. मला त्या नावाचा विरोध नाही. कोणाचे नाव आहे ते असू दया. पण हा विषय जर असाच चालत राहिला तर प्रत्येक वेळेला तीन महिन्याने प्रत्येकाचे नाव बदली करत राहणार ते योग्य आहे का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते, मिरा गावातील हनूमान मंदिराजवळील रंगमंच...

**मा. सभापती :-**

तो विषय मा. महासभेत घेतला जातो. आपण मा. महासभेत तो विषय घेउ.

**शरद पाटील :-**

साहेब पहिला स्टॅण्डींगमधून जातो आणि नंतर मा. महासभेपुढे जातो.

**मा. सभापती :-**

त्याच्यापुढे काय झाले आणि काय नाही ते मला माहिती नाही. आत्ता आपण तात्पुरता घेउ.

**शरद पाटील :-**

हा विषय नाहीच. पण तसा विषय आहे. साहेब, आज झाला आहे. उदया परत होउ नये म्हणून काळजी घ्यायला पाहिजे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, एखादे नांव इथे आले आणि संपूर्ण गावकऱ्यांचा त्याला विरोध असेल तर ते नांव दयायला पाहिजे का? आत्ता हे मिरा गावामध्ये घडलेले आहे. इथे एक नाव आले आहे. कैलास यशवंतराव भोईर खुला रंगमंच असे रंगमंचाला नाव दिले आहे. तर संपूर्ण गावाचा त्याला विरोध आहे. मग असे नांव देउन फायदा काय? गावचे मंदिर आहे. गावची जागा आहे.

**शानू गोहिल :-**

सुचवले कोणी?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

एका व्यक्तिने सुचवले आहे. पण त्या व्यक्तिने सुचवलेले ते नांव दयायचे की गावकऱ्यांचे म्हणणे असेल ते नाव दयायचे. गावकऱ्यांचे एक ऑब्जेक्शन लेटर देईन आणि पुन्हा मा. सभापतींच्या परवानगीने या मिटींगमध्ये घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. १७ घ्या. प्रकरण क्र. ७६, ठराव क्र. ६८ खालची तीन पाने घ्या किंवा आपण वरुन घेउ या. सदर निर्णयानुसार मिरा भाईंदर महापालिकेवर १६ मे २००५. नंतर मंजूर झालेल्या व पंचवीस लक्ष वरील अंदाजपत्रक असणाऱ्या विकास कामाबाबत विशेष भाववाढ अनुमनित करण्यांत आलेली आहे. स्टील सिमेंट दरातील फरक, आर.बी.आय. बुलेटींग इंडेक्स नुसार डांबरामधील भाव फरक, हिंदूस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड दरानुसार करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्य शासन, महानगरपालिका, नगरपालिकेतून भाववाढ देण्यात येत असून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ठेकेदारामार्फत याबाबत मागणीसह पाठपुरवठा करण्यांत येत आहे. सोबत कामाची यादी (१ ते ४५) मागणीसह म्हणजे तुम्ही जे दिलेले आहे ते इन्क्लूड करुन येते. आपल्याला नव्याने काही वाढवायचे नाही. सदर दयावा लागणारा खर्च सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पातील लेखाशीर्षातून भागविण्यात येणार आहे. तरी यादीत नमूद केल्यानुसार रक्कम प्रदानास शासकीय व आर्थिक मंजूरी देण्यात येत आहे. आत्ता मला सांगा याचे जे तपशिल जोडलेले आहे. या प्रोसिडींगमध्ये ते आलेले आहे. पण आम्हाला याच्यातील तपशिलच माहिती नाही. आत्ता ही एवढी अमाउंट आहे, जवळ जवळ पंच्याण्णव लक्ष टोटल अमाउंट दिलेली आहे, तुम्ही याच्यामध्ये वर एक कोष्टक दयायला पाहिजे. याच्यामध्ये तुम्ही जी एस्टिमेट कॉस्ट म्हणता त्याची फिगर काहीच नाही. त्यानंतर शेजारचे जे एक्सप्लेनेशन कॉस्ट आहे. त्याचा फिगर तुम्ही दिलेला नाही. तुम्ही फक्त टोटल अमाउंट दिलेले आहे. म्हणजे आता तुमच्या अमाउंटचा फरक, तफावत काय आहे काही माहिती नाही. हा ठराव झाला मला मान्य आहे. हा ठराव झाला पण या इतिवृत्तांताला मंजूरी या मिटींगमध्ये येणार. तुमचे जे काही व्यवहार असतील, जे काही पेमेंट म्हणा, पेंमेंट थांबवणे, कमी करणे, जास्त करणे हे सगळे याच इतिवृत्तांताच्या मंजूरीनुसार मिळणार. कारण हॉस्टिपटलचे काम थांबवले. मा. स्थायी समितीची सभा होत नाही, मंजूरी नाही. तुम्हांला कुठलाही खर्च करता येत नाही असे मा. आयुक्तांनी मला दिलेले उत्तर आहे. त्याकरिता एकदाही मिटींग झाली की, याच्यामध्ये जे काही असेल ते करायला मिळणार आहे हे बरोबर आहे. आता याच्यामध्ये तुम्ही वाढ करण्याकरिता मागवता. आत्ता दहा रुपयाचे पंधरा करायचे आहेत. पंधराचे तीस करायचे आहेत. तीसचे साठ करायचे आहेत. मग याच्यामध्ये जी डेफिसेशन अमाउंट आहे ती कशाला टाकता. जी ऑलरेडी कमी झाली आहे. त्याची पण लावून दिली. कोष्टक वाचा. हे जे एस्टिमेट दिले आहे त्याच्यामध्ये कमी झाले आहे तेसुद्धा दिले म्हणजे वाढीव रक्कमेचाच विषय आला पाहिजे ना?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ठराव क्र. ६८ मध्ये ज्या निविदा अंतिम केलेल्या होत्या. त्याचे जे एस्टिमेटेड कॉस्ट आहे, १ ते ४५, त्या कामाचे याठिकाणी नमुद केलेले आहे. आणि त्या ठेकेदाराला जे दरपत्रक मंजूर झालेले आहेत ते अबोव्ह किंवा बिलो राहू शकतात. तर त्या मूळ एस्टिमेटेड कॉस्टमध्ये जे एक्सप्लेनेशन वाढलेले आहे. आत्ता पहिले काम घेतले रु. ३७,४४,०००/- तर त्याच्यामध्ये ४,७३,०००/- मूळ अमाउंटमध्ये वाढ झाली असा त्याचा अर्थ आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब त्या अर्थालाच पकडून सांगतो की, आत्ता त्या लिस्टमध्ये तुम्ही पन्नास कामे काढली. त्याच्यातील वाढीव कामाला तुम्ही मंजूरी मागता ना?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वाढीव काम नाही.

**मिलन म्हात्रे :-**

वाढीव काम नाही, एस्टिमेट. तुमची रक्कम.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

भाववाढ झाल्यामुळे किंमत वाढली.

**मिलन म्हात्रे :-**

भाववाढीसाठी तुम्ही हा विषय आणला की नाही? मी काय म्हणतो ते पूर्ण ऐका. एका कामाचे वीस हजाराचे तुमचे तीस हजार झाले आहेत. किंवा एकवीस हजार झाले. ते एक हजार रुपये वाढले त्याच्या मंजूरीसाठी हा विषय आणलात ना? एवढे तरी सगळ्यांना मान्य आहे ना? आत्ता सेंकड कॉलम काय आहे? इथे चव्वेचाळीस आहे. इथे एक्केचाळीस झाला. आत्ता हे ऑलरेडी कमीच आहे ना?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

चार लाख सोळा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामध्ये तुमचे जे फिगर वाढलेले आहेत. लास्ट अमाउंट काहीच दिलेली नाही. कोष्टक असे बनवत नाही. एकूण रक्कम किती आहे? वाढीव रक्कम बजेटमध्ये तरतुद आहे का हे आम्हांला कसे कळणार? आम्ही इथे कॅल्सी घेउन बसणार का? एका कॉलममध्ये तुमचा बॉक्स असायला पाहिजे की, ही रक्कम एवढी होती. त्याच्यामध्ये आम्हांला वीस लाख वाढवून पाहिजे. म्हणजे एक लाख अधिक वीस लाख म्हणजे एकवीस लाख. त्या एकवीस लाखाची बजेटमध्ये तरतुद आहे का ते आम्हाला बघायला नको. कोष्टक बरोबर बनवली पाहिजेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यामध्ये पुन्हा तुम्ही तिन्ही गोष्टी लिहिता. स्टील, सिमेंट किंवा अन्य बाबींमध्ये तर पहिले जी तीन किंवा चार लाखाची भाववाढ दिली. ते कशामुळे आहे, सिमेंटमुळे आहे? आम्ही पण बाजारात जाउन बघू की, सिमेंटचे भाव वाढले का? तुम्ही तीन लाख वाढवून दिली. सिमेंटवर वाढली, लोखंडावर वाढली की अन्य कुठल्या बाबींवर वाढली ती बाब तुम्ही दिली पाहिजे. ती पण इकडे दिली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपायुक्त (मु.) श्री. बालाजी खतगांवकर साहेब तुम्ही इथे आहात. बरेचसे नगरसेवक नवीन निवडून आले आहेत. मागच्या वेळेला आपल्याकडे श्री. दशोरे नावाचे अधिकारी होते. त्यांची मजल एवढी होती की, त्यांनी पाईपलाईनच्या खरेदीवर डबल एक्साईज डयुटीची अमाउंट लावून आमच्याकडे ठराव आणला होता. म्हणजे आत्ता हा टेलिफोन आहे. त्याची एक्साइज डयुटी एकदाच भरली जाते हे जगजाहिर आहे. आपण एखादी कार घेतली तर एक्साइज एकदाच. डीलरकडे मिळाल्यानंतर परत आणखी सेंट्रलची एक्साइज लावली आणि ती अमाउंट लावून विषय आणलेले आहेत. हे सगळे होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब याच्यामध्ये एक आणखीन उल्लेख आला पाहिजे होता. समजा, एखादया कामाला तुम्ही तीन लाखाची डिले अमाउंट दिली आहे. तर त्या कामाची मुदत कधीची होती, मुदत कधी संपली आणि काम किती दिवसापर्यंत चालले? म्हणजे जर त्या मुदतीमध्ये ते काम झाले नसेल आणि तो नंतर काम करतो म्हणून रेट वाढले् तर त्याचापण उल्लेख याच्यात नाही. आपण जेव्हा त्याला देतो तेव्हा मुदत देतो. त्या मुदतीमध्ये काम झाले नाही तर ती त्याची जबाबदारी आहे. कमी झाल्यावर तो रिफन्ड करतो का की, हे सिमेंटचे भाव कमी झालेले आहेत. तो प्रस्ताव येत नाही. ते नियमामध्ये नाही का? एकतर कामाची मुदत एवढी होती. आपल्यामुळे डिले झाला. म्हणून हे वाढ देणे भाग आहे. असा विषय असला पाहिजे. आपल्यामुळे जर त्या कामामध्ये डिले झालाच नाही. त्या पिरिएडमध्ये झाले आहे. त्या पिरिएडमध्ये भाव वाढले् तर कुठल्या गोष्टीमध्य भाव वाढली?

**मिलन म्हात्रे :-**

याचे चेक पेमेंट वगैरे झाले का?

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आर.बी.आय. बुलेटींग इंडेक्स म्हणजे काय?

**तुळशीदास म्हात्रे :-**

कुठल्या कॉन्ट्रक्टरने मुदतीत काम केले नाही त्याला फाईन वगैरे लावला का?

**शरद पाटील :-**

तेसुद्धा झालेले नाही. जे मुदतीत झाले नाही त्यांना दंड कुठे लावला? आणि आपल्यामुळे लेट होण्यासारखे कामच नाही. तर त्यांना आपण पैशाची वाढ देतो. उलट त्यांच्यावर दंड लावायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

एक करोड भाववाढ मंजूरीचा तुम्ही विषय आणला आहे. त्या एक करोडचे पेमेंट झालेले आहे का?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दि. २०/०६ च्या बैठकीत भाववाढीचा निर्णय अंतिम झालेला आहे. आम्ही आत्ता नव्याने आणलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

इतिवृत्तांत मागे केलेले असते तेच मंजूरी दयायचे असते. इतर विषयामध्ये इतिवृत्तांताला मंजूरी मिळालेली नाही म्हणून काम करता येणार नाही. स्टॅण्डींगच्या सभेत विषय आला नाही म्हणून काम करता येणार नाही. बजेटमध्ये तरतुद नाही म्हणून काम करता येणार नाही ही सगळ्या अधिकाऱ्यांची उत्तरे आम्ही दररोज ऐकतो. ह्या इतिवृत्तांताला आज मंजूरी मिळेल. इतिवृत्तांताच्या मंजूरीशिवाय कुठलेही काम पूर्ण होत नाही हे स्पष्ट सांगतो. नसेल तर तुम्ही तुमचे ओपिनिअन दया. आत्ता ह्यापैकी चेक पेमेंट झाले का? हे तुमच्या कॅफोना विचारा किंवा लेखा विभागाचे कोण आले असतील त्यांना विचारा. आत्ताही एक करोड रक्कम तुम्ही खर्च करणार आणि केल्यानंतर आमच्याकडे मंजूरीला येणार. लेखाविभागाचे कोण अधिकारी, आहेत त्यांच्याकडून क्लिअर करा. श्री. बेलवटे साहेबांनी सांगावे की, पेमेन्ट झाले की नाही. अर्धे झाले आहे. पंचवीस टक्के झाले आहे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एक्सलेशन कॉस्टची मंजूरी मागच्या सभेत घेतली होती. त्याची बिले दिलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामध्ये तुम्ही एक अठ्ठेचाळीस लाखचा चेक काढणार आणि एक पंच्याहत्तर हजाराचा चेक काढणार. तसे काही झालेले आहे का? तुम्ही मला हे सांगा की, तुम्ही ही जी पंच्यान्नव लाखाची अमाउंट आमच्याकडे आणली त्याचे पेमेन्ट झालेले आहे की नाही? नसेल तर नाही सांगा. असेल तर हो सांगा. म्हणजे आम्हांला कळेल की, मंजूरीच्या अगोदर पेमेन्ट होते.

**प्रशांत पालांडे :-**

एखादा पेमेन्ट आपण सॅम्पल म्हणून चेक करुन मागवू शकतो.

**मिलन म्हात्रे :-**

एखादा कशाला? दहा घ्या. कुठलीही सिलेक्टेड अमाउंट घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एखादया इतिवृत्तांताला जेव्हा मंजुरी देतात. आत्ता आम्ही देतो. हे नक्की आहे की, या विषयावर तुम्ही एवढी मोठी रक्कम अदा करणार हा विषय कधीतरी उपस्थित होउ शकतो. अधिकाऱ्यांनी तशी तयारी करुन यायला पाहिजे. मी बघितले नाही. प्रत्येकवेळी पुढच्या सभेत उत्तर देतो. पुढच्या सभेत लोक विसरतात. म्हणजे शेवटी नगरसेवकांना भोगायला लागते आणि ही छोटी रक्कम नाही. ठरावामध्ये शासन निर्णय क्रमांक लिहलेला आहे. टक्केवारी लिहलेली नाही. म्हणजे शासनाने तुम्हांला वाटेल तेवढे वाढवायला मंजूरी दिली आहे का? शासन निर्णय क्रमांक दहा टक्क्याने वाढीव आहे. आत्ता आम्ही चार टक्क्याने देत आहोत, सात टक्क्याने देत आहोत, अकरा टक्क्याने देत आहोत आणि याची बेरीज म्हणजे टोटल दिलेल्या कामाचे पन्नास लाख त्याच्यामध्ये चार टक्क्याने वाढ साडेचार हजार झाले. तुम्ही किती टक्के वाढ दिली हे कळणार कसे? कुठल्या कामाला किती टक्के वाढ दिली? याच्यामध्ये तो कॉलम केला पाहिजे. याला सिमेंटवर चार टक्क्याने वाढ दिलेली आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

याच्यात कुठे कुठे कमीपण आहे. ते कसे झालेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कमी कुठे झाले? हे फक्त वाढीव फिगर आहे. पन्नास लाखावर चार हजार सहाशे तीस वाढीव आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. श्री. बालाजी खतगांवकर साहेब, सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब, ज्याप्रमाणे म्हणतात की, एखादे मिनिटस झाल्याशिवाय त्या प्रकरणातील एक रुपयासुद्धा पेमेंन्ट आपण करु शकत नाही हा विषय होता. तर जरा चेक करुन बघा आणि त्यातले काही झाले की नाही ते आम्हांला सांगा.

**शरद पाटील :-**

आम्हांला एखादे काम करायचे असेल तेव्हा नियम लावतात. समजा एखादा टॅक्स लावायचा आहे. तर तो ठराव अजून मंजूर नाही, वाचन झाले नाही करता येणार नाही. अशी भाषा आम्हाला ऐकवून दाखवतात. सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे ते बोलतात.

**नयना म्हात्रे :-**

पहिल्यांदा त्याचे पेमंन्ट झाले का ते बघा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इकडे घोळ आहे. शेवटचा जो कॉलम आहे. एक्स्लेशन याचा अर्थ काय? गैरसमज झालेला आहे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एक्सलेशन म्हणजे भाववाढ.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे त्यामध्ये कमी झालेले नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब पहिले त्याचे पेमेन्ट झाले आहे का ते बघा.

**मा. सभापती :-**

आत्ता आपले ऑडीटर नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

मग विषय पेन्डींग ठेवा आणि ऑडीटर का नाहीत? कुठे गेले?

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब नाहित. ऑडीटर नाहीत.

**शानू गोहिल :-**

ऑडीटर कुठे गेले?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. आयुक्त साहेब, जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युवल मिशनच्या बैठकीसाठी दिल्लीला गेलेले आहेत. आणि मुख्य लेखापरिक्षकांना मा. आयुक्तांनी रिलिव्ह केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आत्ता मला सांगा, तुम्ही प्रत्येक वेळेला कोणाचा कोणला तरी चार्ज देता. आत्ता तुम्ही चार्ज दया नका देउ. स्थायी समिती सभा लागलेली आहे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :- :-**

श्री. शरद बेलवटे यांच्याकडे चार्ज दिलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

चार्ज दिलेला आहे. मग ते सक्षम आहेत. जे गेलेले आहेत त्यांचे नाव तुम्ही घेउ नका.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांना आत्ता १२.०० वाजता चार्ज दिला.

**मिलन म्हात्रे :-**

मिटींग बारा वाजून पाच मिनिटांनी सुरु झालेली आहे. बाराला चार्ज दिला. पण ते बाहेरच्या नगरपालिकेतून आले असे नाही. आत्ता त्यांच्याकडूनच लेखा जोखा व्हायचा. ते फक्त सह्या करायचे.

**टेरी परेरा :-**

विषय पेन्डींग ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, आपल्या ज्या मॅरेथॉन बैठका होता. त्यामध्ये कुठली तरतुद कोणी केली, सगळे अधिकारी हजर असतात. हे जे कोष्टक निघाले त्याच्यामध्ये काय काय दयायचे ते अधिका-यांना माहिती आहे आणि जर त्यांना माहिती नसेल तर या इतिवृत्तांतातील हा विषय बाकी ठेवा आणि पुढे चालू करा.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, एखादा तरी विषय दिला आहे की नाही ते तरी सांगा. ते काढू शकत नाही का? यातील एखादया तरी प्रकरणाचे पेमेंन्ट झाले आहे की नाही ते सांगा.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब हा विषय तुम्ही पेंन्डींग ठेवत असाल तर पुढच्या वेळेला सहकार मजूर संस्थेला जी कामे दिली आहेत. त्याची पण माहिती आणून ठेवा. म्हणजे पुढच्या वेळेला त्याची माहिती आणायची म्हणून पेंन्डींग ठेवायला लागेल. कशाबद्दल दिले आहेत? नगरसेवक निधीतील कामे आहेत की प्रभाग समितीची कामे आहेत. ही सगळी इंत्यभूत माहिती आम्हांला मिळायला पाहिजे आणि यातील किती कामे झाली आणि नाही झाली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यामध्ये तुम्ही लिहिता की नगरसेवक, आमदार फंड पण कोणता आमदार फंड आणि कोणता नगरसेवक फंड आहे याचा कोणताही उल्लेख केलेला नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

इतिवृत्तांत पुढच्या सभेला मंजूरीला ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या माहिती असेल तर अधिकारी सांगतो की आम्हांला काही माहिती नाही. आत्ता आम्हीसुद्धा दोन वर्षे स्थायी समितीमध्ये होतो. सगळे विषयाचे अधिकारी उपस्थित असायचे. हे आमचे अनुभव आहेत आणि हे लोक विषयाची माहिती घेउनच यायचे. तर मेहेरबानी कोणाचाही वेळ वाया घालवू नका. तुमचाही नको, आमचाही नको. व्यवस्थित माहिती अपडेट करुन आणा आणि सगळी माहिती घेउनच या आणि फिगर्स वगैरे याच्यामध्ये चुका करु नका.

**एस. ए. खान :-**

पुर्ण माहितीसह घेउन या आणि याच्यामध्ये टायपिंग मिस्टेकसुद्धा ब-याच आहेत. टायपिंग मिस्टेकसुद्धा आपण सुधारण करुन आणा.

**मा. सभापती :-**

इतिवृत्तांताचा विषय आपण पुढच्या सभेत घेउ या.

**मिलन म्हात्रे :-**

इतिवृत्तांतामध्ये झालेले सर्व ठराव. आता इथे चोवीस लाखाचा विषय आणलेला आहे. रिलायन्स एनर्जी किंवा पूर्वी बी.एस.ई.एस. होती. एम.टी.एन.एल. आहे, रिलायन्स एनर्जी आहे. या लोकांकडून आपली जी काही तोडफोड होते त्याची अमाउंट ते लोक चेकने देतात. बजेटमध्ये आम्ही बसून येणा-या रक्कमेमध्ये त्याची तरतुद करतो की ही रक्कम येणार आहे. साधारण गेल्यावर्षी दहा करोड मिळाले किंवा दहा लाख मिळाले. तर यावर्षी एक साडे दहा करोड मिळतील किंवा साडे दहा लाख मिळतील. आता ह्या रिलायन्स एनर्जीने जी काही तोडफोड केली त्याच्यामध्ये इकडे तेवीस नंबरला आहे. रु. १८,८८,६००/- एवढी रक्कम आहे. खाली दिलेले आहे की, रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदरचा दुर्बल घटकामध्ये अंतर्भूत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकात आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी. वर काय केले? रिलायन्स एनर्जी, पाणी पुरवठा विभागाचे जलवाहिन्या वगैरे जे आहे, खोदकाम करणारे आले. काही ठिकाणी गटारे मोडकळीस आलेली आहेत. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाही. आत्ता हा प्रस्ताव सिटी इंजिनिअरने आणला. आजच्या मिटींगमध्ये सिटी इंजिनियर कुठे आहेत. आत्ता ज्या कंपन्यानी तुमचा जो काही लॉस केला. तुमच्या सिटी इंजिनियरने किंवा तुमच्या जे.ई.ने त्या कंपनीला एस्टिमेट करुन पाठवायचा आहे. रेल्वेवाले तसे करतात. आत्ताच गणपतीला नुसती खडी उचलली. ती खडी तिकडेच आहे. खडी कुठेही गेलेली नाही. तरी साडे आठ लाख रुपये वसुलीचे पत्र त्यांनी आपल्याला पाठवले. आम्ही ते दिले नाहीत तो भाग निराळा आहे. आपल्या एस.आय. ला जाउन आर्ग्युमेंट केले. ते पेमेन्ट दिलेले नाही. तर रेल्वेने इकडचे दगड तिकडे केले त्याबद्दल लगेच पत्र पाठवले. आज तुमच्या जे.ई.ने त्यांना पत्र पाठवले का की, आमचा अठरा लाखाचा लॉस झाला. तुम्ही आम्हाला चेक दया. हा विषय इकडे आर्थिक प्रशासकीय मंजूरीला येउच शकत नाही. तुमचे त्या कंपनीकडून वसूल झाले याबाबत काहीच म्हटले नाही. त्या रिलायन्स एनर्जीकडून रु. १८,६८,६००/- पैकी. अठरा लाखाचा परतावा आलेला आहे. त्या परताव्यामधून आम्हाला एवढी रक्कम खर्च करायची आहे.

**मा. सभापती :-**

आपण त्यांच्याकडून दुस-या मिटींगला घेउ.

**प्रकरण क्र. ०२:-**

दि. २०/६/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

(सदरचा विषय मा. सभापती यांच्या आदेशानुसार पुढच्या मिटींगमध्ये घेण्याचे ठरले.)

**नगरसचिव :-**

पुढचा विषय घेतो. समित्यांचे ठराव, निरंक. आयुक्तांकडील पत्रे व कामकाज. प्रकरण क्र. ०३, महानगरपालिकेच्या सन २००७-०८ मधील मंजूर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्धी करणे या लेखाशिर्षक अंतर्गत तरतुदीचे पुर्नःविनियोजन करणे.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्तांचे पत्र वगैरे याच्यात नाहीत की आलेले नाहीत.

**नगरसचिव :-**

ती मा. महासभेत देतात.

**मिलन म्हात्रे :-**

ती स्थायीला सुद्धा आली पाहिजे. विषयाला कुठेही बगल देउ नका. तुमच्या उपविधीमध्ये जो फॉरमॅट आहे, आयुक्तांकडील आलेला पत्र व्यवहार. मा. महासभा महिन्याने लागते.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण मा. महासभेला देतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे जे बायलॉज नक्की झाले आहेत.....

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्तांची काही पत्र असतील तर असे ते आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्तांना आलेलीसुद्धा पत्र आम्हाला पाहिजेत.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण मा. महासभेला देतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभा नाही. मा. स्थायी समिती सभेलासुद्धा आली पाहिजे. आत्ता सचिवांनी सांगितले की, मा. आयुक्त त्यांच्याकडे आलेली पत्र मला देत नाहीत. आणि मा. आयुक्तांनी मला असे उत्तर दिले की, नगरसचिव माझ्याकडे पत्र मागत नाहीत. हे आयुक्तांचे बोलणे शेवटी सचिवांनी मला पत्र दाखवले की या तारखेला मी मा. आयुक्तांना पत्र दिलेले आहे. मला त्यांच्या कार्यालयाकडून पत्र प्राप्त होत नाहीत. तुमच्या को-ऑर्डीनेशनमध्ये जर हा गॅप असेल तर आम्ही तर एकदम लांब राहिले. एखादया लेबर कोर्टाचे जजमेंट आले की, अमुक अमुक कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यात यावे आणि तुमचा प्रशासनाचा ठराव आला की त्यांना ५६ नुसार कार्यवाही करावी. आम्ही त्याला मंजूरी दयावी. म्हणजे कंटेमप्ट मध्ये आम्ही येणार. आम्ही याचा एक पार्ट आहोत. त्याकरिता जे काही कोर्टाचे निर्णय तुमची आलेली पत्र, जी.आर. हे सगळे आम्हांला पाहिजे. पूर्वी काय केले. आमचा लुक आउट नाही. कारण निर्णय आम्हांला घ्यायचे आहेत. तुम्ही काय करता की, एखादया रस्त्याला नामकरण झाले तर तुम्ही ठराव दाखवता. त्या ठरावानुसार या रस्त्याला हे नाव दिले आहे. आम्ही ते लावणार. ठरावावर बोट दाखवून तुम्ही मोकळे तुमचे त्या ठरावापुरते इम्प्लिमेंटेशन होते. आम्हाला व्यवस्थित ठराव करण्याकरिता जी.आर. वगैरे वाचता येतील असे दया. कुठल्याही गोष्टीत आम्हांला अडकायचे नाही. तुम्हांला सपोर्ट करायचा आहे. तुमचे काम व्यवस्थित झाले पाहिजे. एखादया ठरावातील त्या जी.आर.मध्ये नोंदणीकृत झाले नाही. आत्ता हा साडेचार लाखाच्या वर खर्च करु नये. हा जी.आर. वाहनाकरिता होता. तो आपण सभागृहापुढे आणला नाही. मा. स्थायी समिती सभेला आणला नाही आणि तुम्ही वाहने खरेदी केली. आपल्याकडे सव्वा करोड रुपयांची वाहने खरेदी झाली. जी.आर. साडे चार लाखाचा राहिला. आपल्याकडे आठ आठ लाखाच्या गाडया आपण घेतो. हे उदाहरण आहे आणि आता त्याची मंत्रालयात एन्क्वायरी चालू आहे. साडे चार लाखाची खर्चाला अनुमती असतांना सुद्धा आठ लाखाच्या गाडया कशा घेतल्या? आणि त्याच्यामध्ये मा. आयुक्तांनी सरळ सांगितले की माझा काही दोष नाही. ज्या मा. स्थायी समितीने ठराव मंजूर केले. आणि ज्या उपायुक्तांना इम्प्लिमेंट केले ते जबाबदार आहेत. हे मा. आयुक्तांचे स्टेटमेंट आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, त्यामध्ये आणखीन समित्यांचे ठराव शेवटी वृक्षप्राधिकरण समितीची सभा झाली. त्यामध्ये दोन ठराव झालेले आहेत. तुम्ही जेव्हा याच्यामध्ये मागच्या इतिवृत्तांताचा उल्लेख करता. ते झाले म्हणून उल्लेख केलेला आहे. मग ते ठराव झालेले आहेत असे तुमचे म्हणणे आहे की, यांना मिळालेले नाहीत.

**नगरसचिव :-**

इथे आल्यानंतर आपण सादर करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे तुम्हाला मिळालेला नाही. त्यांनी दिला नाही. याचा अर्थ की ते देणार नाहीत. इकडे येणार नाही. याचा अर्थ हा झालेला आहे की, एक तर सचिवांनी मागणी करायची नाही. त्यांनी दयायचे ही त्यांची डयुटी आहे. त्यांनी दिले नाही. दिला नाही म्हणून विषय निरंक लिहून मोकळे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वृक्षप्राधिकरणाचे कामकाज इंडिपेंन्डेंटली होत नाही. ते सचिवांमार्फतच होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा शेवटची सभा झाली. त्याच्यामध्ये प्रदर्शनी झाली. त्या प्रदर्शनीमध्ये लाखो रुपयांचे पेमेंट झालेले आहे. मग तो इकडे का आला नाही.

**नगरसचिव :-**

पुढच्या वेळेला येईल.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पुढच्या वेळेला येईल.

**नगरसचिव :-**

पुढच्या वेळेला अजून बरेच विषय येणारे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

परिवहनमध्ये पण काय निकाल लागतात? अनुदान मागायला मा. महासभेकडे येतात. आज परिवहन लॉसमध्ये चालली आहे. एकोणचाळीस लाखाचे ऑफीस बनले आहे. त्यांनी पहिल्यांदा शंभर टक्के प्रॉफीटमध्ये आणावे. गाडयांची हालत खराब आहे. रस्त्यावर गाडया बंद पडतात. तिथे तुमचा एकही अधिकारी जाउन बघत नाही. आणि बंद असलेल्या गाडयांची बिले निघतात. आम्ही सगळे काढलेले आहे. म्हणजे गाडी अर्धा-अर्धा दिवस बंद आहे आणि त्याची बिले संध्याकाळी काढलेली आहेत. कुठेतरी सुधरावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एवढेच नाही तर आता ॲग्रीमेंट झालेले आहे. पहिला करार, त्याला पुरवणी करार झालेला आहे. तर पुरवणी करार करण्याची पद्धत....

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता परिवहनमध्ये त्यांनी काय ठराव केला तो सांगा. परिवहनमध्ये उदया त्यांनी ठराव केला की तीन नाही तीस पैशामध्ये प्रवासी वाहतूक करायची. आज त्यांनी ठराव केला तर आम्हाला कसे कळणार? परत चार करोड अनुदान दया म्हणून आमच्याकडे आले. आम्हाला काय कळणार? आम्ही मा. महासभेने प्रॉफीटमध्ये चालू आहे म्हणून सहा रुपये तिकीटाचा रेट आहे. आत्ता उदया त्यांनी ठराव केला.

**मा. सभापती :-**

आत्ता तो विषय येईल त्यावेळेला आपण चर्चा करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब आत्ता जे सचिव साहेबांना विचारले होते की, परिवहन ही एक स्वायत्त संस्था आहे. आपले काही देणे घेणे नाही. परिवहनचा विषय माझ्या लक्षात होता. म्हणजे परिवहनला अनुदान देताना मा. स्थायी समिती, मा. महासभा लागते.

**मा. सभापती :-**

माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, विषयपटलावर जो विषय असेल तो धरुन चालायचे आहे. नाहीतर कोणाचे ऐकले जाणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी विषयपत्रिकेचे बोलतो. त्यांनी विषयपत्रिका आणताना मा. आयुक्तांनी दिलेले पत्रव्यवहार, मंत्रालयात किंवा कुठे आहेत ते. पुढच्या मिटींगमध्ये आम्हाला सर्व पाहिजे. अपडेट म्हणजे त्या मिटींगच्या तारखेपर्यंत काल पत्रव्यवहार आला त्याचेपण आम्हाला पाहिजे. तशा सुचना तुम्ही मा. आयुक्तांना करा. तुमच्यामध्ये टोलवाटोलवी चालली आहे. मा. आयुक्त सांगतात सचिव देत नाही आणि सचिव सांगतात मा. आयुक्त देत नाहीत. लेखी पत्रव्यवहार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, विषयांतर नाही, समित्यांचे ठराव मागितले. परिवहन समिती आहे म्हणून विचारले की, परिवहन समिती काही नाही का? तेव्हा ते बोलले की परिवहन ही एक स्वायत्त संस्था आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अनुदान मागायला ते आमच्याकडे येतात. स्वायत्त संस्था वगैरे काही नाही. ज्यावेळेला तुम्ही परिवहन आणले त्या वेळेला वाद झाला. त्यावेळेला मा. आयुक्त श्री. आर.डी. शिंदे होते. ते बोलले की, ठाण्याला परमिशन मिळणार आहे, मुंबईला मिळणार आहे, कल्याण-डोबिंवलीला मिळणार आहे आणि या तिन्हीकडून तुम्हाला नकार आलेला आहे. हे लक्षात घ्या म्हणून इकडे जे काही असेल ते ठराव आम्हाला पाहिजे. आमच्या जनरल बजेटमधून जेव्हा तुम्ही चार चार करोड रुपये अनुदान घेता तेव्हा संबंध नसतो का? त्या चार करोडचे तुम्ही काय केले?

**मा. सभापती :-**

ते मंजूर करण्यासाठी आपले सगळे नगरसेवक सहभागी असतील.

**मिलन म्हात्रे :-**

असू दया. ते असतील, आम्ही नसणार. तुम्ही त्यांचे ठराव मागवून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या शहरातील लोकांना आवश्यक बाब आहे म्हणून आपण देतो. पण त्याच्या मागचा घोळ कोणी बघत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

परिवहनच्या गाडया बंद असतात आणि आम्हाला लोक रस्त्यात थांबवून विचारतात. चाललो असलो तर थांबवतात. आणि सांगतात की, ही बघा. ही गाडी बंद पडली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. बालाजी खतगांवकर साहेब, आपल्याकडे परिवहनचा चार्ज आहे. तर स्थायी समितीपुढे ठराव आले पाहिजे की, नाही?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. स्थायी समितीसमोर परिवहनाचे ठराव येत नाहीत.

**एस. ए. खान :-**

यायला पाहिजे ना?

**नयना म्हात्रे :-**

म्हणजे त्यांना अनुदान पाहिजे असेल तरच ते स्थायी समितीसमोर येतात.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब यायला पाहिजे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महासभेला येतात.

**प्रशांत पालांडे :-**

तसा नियम आहे का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. नगरसचिव आपण ज्या जाहिराती देतो. त्याच्यावर शासनाचा निकष काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

पण मा. महासभेपुढे तरी कुठे आणता? परिवहन चालू झाल्यापासून तुम्ही मा. महासभेपुढे तरी कुठे आणता? त्यांचे ठराव कुठे आणले? तुम्ही ही जी मंजूरी मागता, पुढे एक कोष्टक दिलेले आहे, पंधरा लाखाची मंजूरी आणि पुढे इतर कर वगैरे, जकात विभागातून अभिकर्ता नेमणेबाबत जाहिर सुचना. वृत्तपत्रात दिल्यामुळे रु. १.९६/- लाख तसेच लेखा विभागाच्या डबल एन्ट्री सिस्टम, पाणी पुरवठा विभागाच्या इंडियन एक्स्प्रेसला जाहिराती एकोणसत्तर हजार, पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग तसेच एकूण वर्षाची जाहिरात बिले तीन लाख त्रेसष्ट हजार. याच्यामध्ये हा विषय कोणी आणला? इकडे कोणाचीही सही नाही. हा प्रस्ताव मा. आयुक्तांनी दिला. आत्ता मला सांगा टॅक्सला आपण जाहिराती दिल्या. लाखात खर्च केला. रिकव्हरी काय झाली ते दिले का? वर्तमानपत्राची जाहिरात येते. साहेब, आम्हाला माहिती नाही. ठाण्याला प्रसिद्ध होणारे तिकडच्या तिकडे खपते. इकडे एक कॉपी नसते. तुमच्या जी.आर.नुसार काही कम्प्लशन आहे. तुमच्याच शहरामध्ये किमान चाळीस टक्के खप असणाऱ्या वृत्तमानपत्राला जाहिराती दिल्या गेल्या पाहिजे असे गव्हमेंटचे जी.आर. आहेत.

**शरद पाटील :-**

कुठच्या पत्रकाचा चाळीस टक्के खप होतो असा काही सर्व्हे आहे का?

**एस. ए. खान :-**

गव्हमेंटतर्फे दाखला घेतला का?

**शानू गोहिल :-**

जी.आर काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

बऱ्याचशा वर्तमानपत्रात तुम्ही कुठे जाहिरात देता? तुमच्या नोटीस बोर्डावर काही नसते. वर्तमानपत्रात जाहिरात आल्याचे त्या पी.आर.ओ. डिपार्टमेंटला काही पडलेले नाही. त्यांनी नोटीस बोर्ड कधी...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्या ज्या डिपार्टमेंटच्या निविदा निघाल्या त्यांच्या कार्यालयासमोर लावायला पाहिजे असा नियम आहे. आजपर्यंत लावले नाही. आत्ता एक साधे उदाहरण आहे. टी.डी.आर पद्धतीने दिलेले प्लॉट तुम्ही दिले. ते सन्मित्र की कुठल्यातरी पेपरमध्ये आले. इकडच्या संस्थांना कोणाला माहिती नाही. म्हणजे गावातली जमीन कोणी दुसऱ्याने घेउन जायची आणि स्थानिक संस्थांना माहिती नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

शक्यतो, मिरा भाईंदर शहरात नाही. इतर ठिकाणी पण नवशक्ती...

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आता ठाणे महापालिकेत काम केलेले आहे. तुमची जी काही विषयपत्रिका आहे ती तिकडच्या सन्मित्र या लोकल पेपरमध्ये पानेच पाने भरून येते. नागरिक तिकडे हजर राहतात. आपल्याकडे ती सिस्टमच नाही.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण सुद्धा देउ शकतो.

**नगरसचिव :-**

मा. महासभेची विषयपत्रिका आपण देतो.

**शरद पाटील :-**

कुठच्या पेपरला देता?

**नगरसचिव :-**

सागर, जनमत ह्या पेपरला असते.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हांला कधी मिळाली नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सागर पेपरचे तुम्ही सांगता. ते पेपरच्या पेपर टेंडरचे उचलले जातात. लोकांच्या हातात ते पेपर अजिबात मिळत नाहीत.

**नगरसचिव :-**

लोकमतमध्ये सुद्धा येते.

**मिलन म्हात्रे :-**

लोकमतमध्ये देण्यात अर्थ नाही. लोकमतचा रेट जास्त आहे. तुमच्या स्थानिक वर्तमानपत्राचे रेट कमी असतात. तुमचे दै. सागर वगैरे आहेत ते ठाण्यातील दैनिक आहेत. त्या दैनिक पेपरला दिले तर लोकांना बरोबर कळते आणि त्यांनी दैनिक पेपरलाच दिले पाहिजे. महाराष्ट्रातील लोक तुमच्या मा. महासभेला येणार नाहीत.

**नगरसचिव :-**

आपण दै. सागर, दै. लोकमत व सुरजप्रकाश या तिन्ही पेपरला देतो.

**तूळशीदास म्हात्रे :-**

नवशक्तीचा रेट सगळ्यांत कमी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, नवभारत म्हणून जो हिंदी पेपर आहे. त्याच्यामध्ये ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोबिंवली महानगरपालिका यांच्या सर्व जाहिरात येतात. आपल्या जाहिराती कधी मी नवभारमध्ये बघितल्या नाहीत. फक्त जी कराची वसूली होती कारण हिंदी भाषिक आहेत ते कर भरतील म्हणून ती जाहिरात त्याच्यात आली. बाकीची टेंडरची जाहिरात मी नवभारतमध्ये कधी बघितली नाही. म्हणजे पैसे वसूल करायचे म्हणून हिंदी पेपरमध्ये बरोबर जाहिरात दिली.

**मिलन म्हात्रे :-**

अधिकारी वर्ग परत आम्ही नगरसेवक आणि प्रेसमध्ये भांडणे लावायची शक्यता आहे. तुम्ही एक काम करा, एखादया ठरावामध्ये ज्या नोटीसा दयायच्या आहेत. त्यांना लॉटरी सिस्टम करा. म्हणजे कुठला पत्रकार पण त्याच्यामध्ये नाराज नाही राहिला पाहिजे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी आपल्याला अवगत करु इच्छितो, आपल्या महापालिकेकडे ऑलरेडी ती सिस्टम आहे. शासनमान्य राज्यस्तरीय, विभाग स्तरिय आणि जिल्हास्तरीय वृत्तपत्रांची यादी आहे आणि त्या कामाच्या व्हॅल्यूप्रमाणे, दहा लाखाची कामे, वीस लाखाची कामे, कोटीची कामे, दैनंदिन कामे, याप्रमाणे जाहिराती रेग्यूलाईज करुन देण्याची पद्धत आपल्याकडे आहे. त्याचे रेकॉर्डसुद्धा आपल्याकडे मेन्टेन आहेत. आपल्याला पहायेच असल्यास आपण पाहू शकता. म्हणजे आपण रॅन्डमली कोणाला जाहिराती देत नाही. तर त्याची एक सुची आहे आणि आपण त्याच्यासाठी जबाबदार कर्मचारी नियुक्त केलेले आहेत. त्या कामकाजाच्या पद्धतीने हे दिले जाते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हे तुमचे म्हणणे झाले. पण पत्रकारांनी तुमच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. एका वर्तमानपत्राला तुम्ही दिले की सगळे त्यालाच दिले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याचा अर्थ नवभारतला कधी विषयच आला नाही की त्याच्यामध्ये कधी जाहिराती दिल्या पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

दै. महानगरसारखा एवढा मोठा पेपर आहे. त्याच्या संपादकांची तुम्हांला पत्र आहेत. आम्हाला तुमच्या जाहिराती कोणी देत नाही. सांगायचा दृष्टीकोन काय की, तुम्ही बॉक्स ठेवा. त्याच्यामध्ये चिठ्ठया टाका. आणि तुम्ही तुमच्या रुटीनवाईज, म्हणजे पार्शिलिटी झाली नाही पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नवभारत जास्त रेट घेतो किंवा जाहिराती घेतो. नवभारतमध्ये कल्याण-डोबिंवली महापालिकेची ८०टक्के जाहीरात असते आपली कधीच नसते. फक्त कराची थकबाकी होती ती चार पानाची आली. कारण हिंदी भाषिक लोक कर भरतील.

**मा. सभापती :-**

त्याच्यापेक्षा एक पॅटर्न करा की, आपल्याला कोणत्या वर्तमानपत्रात दयायचे आहे.

**एस. ए. खान :-**

साहेब, तुमच्याकडे लिस्ट आहे ती लिस्ट दया मला.

**शानू गोहिल :-**

२००७-०८ का जो बजेट है। वो बारा लाख का बजेट है। एप्रिल से लेकर नंवम्बर तक आठ महिने मे बारा लाख खर्च हो गए। जब की चार महिने बाकी है। उसके लिए पंधरा लाख के मंजूरी के लिए यहाँ पर आया है। परंतु, बारा लाख कहा पर खर्च हूए? उसका पुरा डिटेल दिया जाए। गव्हेर्मेंटका जी.आर. क्या बोलता है उस जी.आर. की कॉपी हमे दी जाए।

**एस. ए. खान :-**

पुर्ण डिटेल दया.

**शानू गोहिल :-**

आम्हांला पूर्ण डिटेल दया आणि नंतर विषय स्थायी समितीला आणा.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

चार महिन्यासाठी मागितला आहे.

**शानू गोहिल :-**

चार महिन्याला पंधरा लाख खर्च करतात म्हणजे काय? बारा लाख तुम्ही कुठे खर्च केले. त्याची डिटेल आम्हाला दया. नंतर हा विषय आणा.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे डिटेलसुद्धा आहे.

**एस. ए. खान :-**

तुम्ही दयायला पाहिजे.

**शानू गोहिल :-**

चार महिन्यांत पंधरा लाख खर्च करणे म्हणजे काय?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण महापालिकेच्या सर्व जाहिराती, विकास कामाच्या जाहिराती, वेगवेगळ्या जाहिराती, आवश्यक जाहिराती, जाहिराती म्हणजे शुभेच्छा जाहिरात देत नाही. ज्या कामकाजाच जाहिराती आहेत. त्या जनसंपर्क विभागातून आपण रोटेशन पद्धतीने देतो आणि त्याचा जो बारा लाखाचा खर्च झालेला आहे. त्याचे रजिस्टरसुद्धा मेन्टेन आहेत. ते सुद्धा आपल्याला अवगत करता येईल. आणि यापुढे अपेक्षित पंधरा लाखाची त्यांनी मागणी केलेली आहे. त्याच्यामध्ये तुम्ही कमी जास्त करु शकता. पण पुढे चार महिन्यासाठी निधी नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब चार महिन्यासाठी पंधरा लाख हे तुम्हांला पटते का?

**शरद पाटील :-**

आठ महिन्यासांठी बारा लाख रुपये आणि चार महिन्यांसाठी पंधरा लाख, त्याच्यात कमी जास्त बार्गेनिंग करायची तर काय करायची? म्हणजे दुकानदाराने सांगितले दोनशे रुपये किलो तर शंभर रुपये कमी करायचे असा हिशोब झाला.

**सुनिता पाटील :-**

साहेब, बारा लाखामध्ये किती जाहिराती दिल्या?

**शानू गोहिल :-**

आम्हाला सविस्तर माहिती दया.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपल्या बजेटमध्ये टोटल तरतुदीमधून एवढे जर बजेट असेल अर्धा टक्का विकास निधी, अर्धा टक्का नगरसेवक निधी अर्धा बालकल्याण समिती निधी याला काही टक्केवारी निश्चित नाही का?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याला काही टक्केवारी निश्चित नाही. जशी कामे निघतात जशी आपल्याला गरज असते. इलेक्शनच्या कामकाजामध्ये आपल्या जास्त जाहिराती झाल्या. आत्ता पुढच्या वर्षी जनरल इलेक्शन नाही तेव्हा कमी होउ शकते. आपले जे धोरण आहेत, कामकाज आहे त्याप्रमाणे दिलेल्या जाहिराती आहेत.

**शानू गोहिल :-**

साहेब, आम्ही तुम्हाला तेच विचारले. तुम्ही आम्हाला सविस्तर माहिती दया.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे आहे.

**शरद पाटील :-**

साहेब जेव्हा इलेक्शन होते तेव्हा जास्त खर्च झाला. आत्ता इलेक्शन नाही तेव्हा कमी खर्च व्हायला पाहिजे. इथे जास्त दिले आहे.

**सुनिता पाटील :-**

इलेक्शनच्या वेळी आम्ही जाहिराती दिल्या.

**प्रशांत पालांडे :-**

आपण आमउन्ट सांगा तेवढे मंजुर करू. पंधरा लाख एवढे मंजुर नको करूया.

**नयना म्हात्रे :-**

आधी त्यांना माहिती देउ द्या.

**एस. ए. खान :-**

कोणाकोणाला द्यायचे बाकी आहेत त्याची माहिती द्या.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ही अत्यावश्यक बाब आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, अत्यावश्यक बाब आहे हे आम्हाला मान्य आहे. पण आठ महिन्यासाठी बारा लाख आणि चार महिन्यासाठी पंधरा लाख हा हिशोब कसा बसेल ते सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही थकबाकी द्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुमचा अपेक्षित खर्च किती आहे. तेवढाच सांगा.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अजुन चार महिने आहेत तर साधारण तीन चार लाख लागतील.

**नरेंद्र चव्हाण :-**

कमीत कमी पाच लाख लागतील.

**मिलन म्हात्रे :-**

पण साहेब तुम्ही पंधरा बोलता. तुम्ही आठ लाख खर्च केले. बाराचा फिगर दिला. तुम्हाला पंधरा दिवस वाढवून पाहिजे. म्हणजे तुमचे बारापैकी आठ दिले.

**नरेंद्र चव्हाण :-**

बारा प्लस आठ , वीस आले.

**मिलन म्हात्रे :-**

आणखीन पंधरा.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण पेमेंट देणे बाकी असलेले आठ लाख रुपये आहेत. असे त्यांचे म्हणणे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय म्हणतो ते तुम्ही शांतपणे ऐकुन घ्या. तुम्ही बाराचा फिगर दिला. तरतुद करण्यात आली. असुन माहे एप्रिल २००७ पासुन झालेल्या खर्चात एकतीस इतकी रक्कम शिल्लक आहे. बारा पैकी शिल्लक किती ते सांगा.

**नरेंद्र चव्हाण :-**

बारा पैकी अकरा लाख नव्व्याणव हजार रुपये खर्च झालेला आहे. शिल्लक काही नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्ही ३१ टक्के कसे सांगितले?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये जाहिरातीसाठी बारा लाखाची तरतुद होती. जुन २००७ अखेरपर्यत रु. ११,१९,९६९/- चे पेमेंट झालेले आहे. विभागाच्या माहितीप्रमाणे अजुन आठ लाखाचे पेमेंट करणे बाकी आहे. अजुन चार महिन्याचा कामकाजाचा कालावधी अपेक्षित आहे. विभागाने पंधरा लाखाच्या वाढीव तरतुदीसाठी हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

चार महिन्यासाठी तुम्हाला किती लागणार आहेत ते सांगा.

**नरेंद्र चव्हाण :-**

सात लाख लागतील.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आठ लाखाची बिले पेंन्डीग आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या बजेटमध्ये तरतुद किती आहे हे मला सांगा.

**नरेंद्र चव्हाण :-**

मुळ तरतुद बारा लाख आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आता बॅलन्स किती आहे?

**नरेंद्र चव्हाण :-**

बॅलन्स नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्ही रु. ३१/- बाकी आहेत का?

**नेरेंद्र चव्हाण :-**

हो तेवढेच बाकी आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आता मला सांगा आम्ही तुम्हाला तरतुदीला मंजुरी दिली. पधंराची दिली, सोळाची दिली. दहाची दिली, तुम्ही रिऑप्रिपशन करणार ना? मग रिऑप्रोप्रिएशनचा प्रस्ताव तुम्ही कोणत्या खात्यातुन घेणार?

**नरेंद्र चव्हाण :-**

मागे टॅक्समधुन दिले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आता याच्यातुन दिले का? समजा हे पत्र मला मिळाले नाही. याशिर्षातुन आम्हाला घ्यायचे आहे असे तुम्ही दिले का?

**नरेंद्र चव्हाण :-**

त्याच्यामध्ये आहे.

**मिलन म्हात्रे :-**

विषय काय आहे तो बघा. खाली सगळ्या डिपार्टमेंटच्या स्वाक्षऱ्या आहेत. म्हणजे परवानगी मागताना त्यांनी फक्त हे प्रपत्र लावून दिले आहे. ३०/०९/२००७ च्या पत्रामध्ये त्यांनी द्यायला नको? साहेब, रिअॅप्रोप्रिएशन असे नसते. लेखापरिक्षणाकडे अमुक लेखाशिर्षातून आम्हाला एवढे पाहिजे आणि त्याच्याखाली मंजुरी आणि सह्या खाली आहेत ही सही दिली आहे. ही मंजुरी इकडे आली यांना जे काही म्हणायचे आहे ते वर म्हणायचे आहे आणि त्याच्या खाली यांच्या सह्या आहेत. हे प्रपत्र ह्यांनी नंतर जोडलेले आहे. तुम्ही जे पत्र दिले ते पत्रसुद्धा चुकीचे आहे. ह्यांच्या सह्या यांच्यावर आल्या पाहिजे. तुम्हाला अधिकाऱ्यांनी मंजुरी दिली पण कुठल्या डिपार्टमेंटमधून?

**नरेंद्र चव्हाण :-**

साहेब, रिपोर्टच्या मागे बघा.

**मिलन म्हात्रे :-**

तसे नाही, जी पद्धत आहे ती आहे. उद्या तुम्ही बोलाल की, मी दिलेलीच नाही. अधिकारी नंतर हात वर करतात. तुम्ही चार लाइनमध्ये स्पष्ट म्हणा की, आम्हाला पाणी पुरवठा मधून दोन लाख पाहिजे. लेखाशिर्ष क्रमांक अमुक अमुक बांधकाम विभागातून तीन लाख पाहिजे, लेखाशिर्ष क्र. ०५ तुम्ही डिटेल द्या.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब, रिअॅप्रोप्रिएशनसाठी नमुना दहाची तरतुद आहे. त्याच्यामध्ये जबाबदार अधिकाऱ्याने त्याला मान्यता देउन तो फॉर्म आपल्या मान्यतेसाठी आणावा लागतो.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे. तुम्ही म्हणता, जबाबदार अधिकाऱ्याने जी सही केली आहे त्याच्यावर काही नाही. फक्त ही पत्रके जोडली आहेत. मी काय म्हणतो ते परत एकदा सांगतो. तुम्हाला पंधरा पाहिजे ना? पाच त्रिक पंधरा, तीन डिपार्टमेंट मधून तुम्ही पैसे घेणार आहात असे तिकडे लिहा. बांधकाम विभागाकडून पाच लाखाचे रिअॅप्रोप्रिएशन पाहिजे. ते टाका आणि त्याच्याखाली सह्या घ्या. अधिकारी करतील ते सगळे पुर्व समजू नका. आम्हाला जेवढे कहते तेवढे पाहिजे. उद्या अधिकारी हात वर करेल. आत्ता एवढे मोठे प्रकरण झाले ते काय झाले ते तुम्हाला माहिती आहे काय? पटलावर काही गोष्टी आणू का? अधिकारी मंजुरी देताना सरळ बोलतो की, त्या अधिकाऱ्यावर मी विश्वास ठेवला आणि सही केली आणि आत्ता टांगलो. हे काय आहे. म्हणजे अधिकारी म्हणतो टांगलो आम्हाला टांगलो बोलायची पाळी येईल. या अधिकाऱ्यांनी वर लिहावे की, अमुक डिपार्टमेंटकडून पाच लाख पाहिजे, इकडे दोन लाख पाहिजे आणि खाली त्याची मंजुरीला सही अगोदरच्या सभेत त्यांनी सांगितले की, कॅफोला आपण पाठवलेले आहे. तारीख दिलेली आहे. आत्ता चार्ज नविन आहे. त्यामुळे काही द्यायचे नाही. पुढच्या मिटींगला घ्या.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांना मी अवगत करतो. हा काही वेगळा खर्च नाही. ही अत्यावश्यक खर्चातली बाब आहे. आणि हे प्रशासकिय रिअॅप्रोप्रिएशन आहे.

**प्रशांत पालांडे :-**

ऑलरेडी, आठ लाख खर्च केला आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. श्री. खतगांवकर साहेब, ही जाहिरातीची आठ लाख रूपयांची बिल देणे बाकी आहेत. ती जाहिरातीचा उध्दार करून देतात.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

म्हणून हे पाठवलेले आहे.

**सुनिता पाटील :-**

सविस्तर माहिती द्या आणि पुढच्या मिटींगला घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

हा आठ लाख रूपये खर्च ऑलरेडी एक्स्ट्रा झालेला आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, आपण जेव्हा प्रस्ताव ठेवतो. बारा लाखाचा खर्च झाला. पंधरा लाखाचा अपेक्षित आहे. अधिकाऱ्यांनी टिपणी देताना बारा लाख याच्यात खर्च झालेले आहेत. पंधरा लाख आम्ही यासाठी मागितले की, सात लाख देणे बाकी आहे. दोन तीन लाख हे चार महिन्यासाठी पाहिजे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते चर्चेतुन क्लीअर झाले ना?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ते तसे लेखी यायला पाहिजे होते.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती महोदय, एक अमाउन्ट बोला आणि पास करा.

**एस. ए. खान :-**

पण डिटेल पाहिजे.

**मा. सभापती :-**

माझे एक सांगण आहे की, आपण बारा लाखाची तरतुद केली होती मग आता बारा वरून वर्षाला किती टक्के वाढू शकते. याच्यात तुमचे काही मत असेल की नाही?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आमचे मत लेखी दिलेली आहे आणि रिॲप्रोप्रिएशनचा जो फॉर्म आहे. तो मुख्यलेखाधिकारी, मा. आयुक्त साहेबांनी मान्यता देउन केलेला आहे. ते लेखी मत असताना अजून वेगळे माझे मत हवे का?

**मा. सभापती :-**

आपण ज्यावेळी बारा लाख मंजुर केले.....

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पंधरा लाखाची अपेक्षा आहे.

**मा. सभापती :-**

वर्षभराची १२ लाख मंजुर केल्यानंतर लागून लागून किती टक्के वाढीव लागणार आहे. म्हणजे १०० टक्के वाढली गेली.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

रिअल कामकाजामध्ये जर आपण गेलो तर आपला बजेट जो आपण मार्च एण्डला मंजुर करतो. त्याच्यापुर्वीचे सुद्धा आजच्या आर्थिक वर्षाचे पेमेन्ट राहतात. ते या आर्थिक वर्षात खर्च करतात. सर्व बारा लाख या आर्थिक वर्षाच्या जाहिरातीसाठीच दिले असे मी सांगू शकत नाही. मागच्या कामकाजातील विषयसुद्धा येतात.

**प्रशांत पालांडे :-**

ते बजेट करताना कन्सीडर व्हायला पाहिजे होते.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते त्यावेळेस केले असते तर आत्ता गरज पडली नसती.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही अंदाजित खर्च बारा लाख दिलेला. पण आत्ता वीस लाख झाला. बारा खर्च दिलेला आहे. आठ लाख देणे बाकी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याची डिटेल माहिती घेता येईल.

**सुनिता पाटील :-**

माहिती घ्या. आणि मग पुढच्या मिटींगला द्या.

**मा. सभापती :-**

हा गरजेचा भाग असल्यामुळे आपण त्यांना दहा लाखाची मान्यता देउ.

**शानु गोहिल :-**

असे कसे मान्यता देता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आम्हाला सविस्तर हिसाब किताब दाखवा.

**मा. सभापती :-**

तुम्हाला सविस्तर हिसाब किताब मिळेल.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही पुढच्या मिटींगला हा विषय घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अर्धे द्या. कामकाज चालू राहिल आणि पुढे डिटेल मिळाल्यावर द्या.

**एस. ए. खान :-**

त्यांनी आठ लाख उधारी दिली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांनी जो विषय सांगितला तेवढी मान्यता द्या आणि राहिलेली अंतिम मान्यता माहिती मिळाल्यावर द्या.

**मा. सभापती :-**

हा विषय पुढच्या सभेत घेउ या. त्याची सविस्तर माहिती तुम्हाला देण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, कुठल्या वर्तमानपत्रामध्ये किती बाकी आहेत? मोठे मोठे वर्तमानपत्रांची बिले बाकी आहेत ती किती महिन्यांची किती वर्षाची बाकी आहेत. ती लिस्ट मागवा. आपल्या महानगरपालिकेची बदनामी होते. ज्याची जुनी मागणी आहे ती रिक्वायरमेन्ट पुर्ण करा. ज्याचे दोन वर्षापासून बिल थकले असेल मग ते कोणत्याही वर्तमानपत्राचे असू द्या. आपण व्यवहारामध्ये जी जुनी उधारी असेल ती देतो. तसे करुन घ्या. त्यांची डिटेल असल्याशिवाय कसे करणार?

**एस. ए. खान :-**

पुढच्या सभेमध्ये जाउ द्या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, एक विषय वेगळा आहे पण सभागृहाला थोडी माहिती हवी आहे. आत्ता मा. श्री. खतगांवकर साहेब आपण माहिती दिली की, श्री. बनसोडे साहेबांना आपण कार्यमुक्त केलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

होणार आहेत. ऑर्डर दिलेली आहे.

**प्रशांत पाटील :-**

असे कार्यमुक्तीचे आदेश अजून कोणाला दिलेले आहेत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शहर अभियंता.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांनी स्विकारली की नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आत्ता ऑर्डर दिलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

ती माहिती आम्हाला द्या.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या माहितीनुसार तुम्ही जी ऑर्डर दिली ती त्यांनी अजूनपर्यंत स्विकारलेली नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, त्यांनी स्विकारण्याचा प्रश्न नसतो. ऑर्डर एकदा निघाली की, ते आत्ता घेतील, नंतर घेतील. पण त्यांना घ्यावेच लागेल.

**प्रशांत पालांडे :-**

आतापर्यंत त्यांनी घेतली की नाही ती माहिती द्या.

**मिलन म्हात्रे :-**

त्याची कॉपी तुम्ही आस्थापनेला दिली का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

होय दिली. आस्थापना, शासनाला, लेखा विभागाला, वित्त विभागाला, सभागृह नेत्यांना, स्थायी समिती सभापतींना सर्वांना दिल्या.

**मिलन म्हात्रे :-**

बरेचसे अधिकारी डिमोशनचे सस्पेन्शनचे किंवा बदलीचे आदेश न घेता दोन महिने, वर्षभराच्या रजेवर जातात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ती वेगळी बाब आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आमचे म्हणणे असे आहे की, त्यांनी घेतली की नाही ते तुम्ही सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही डिक्लेअर करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ऑर्डर तामिल करायची प्रोसेस असते. ते इथे कसे करता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

मला सांगा, आजपासून आपल्या आस्थापनेवर आहेत की नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

दोन्ही अधिका-यांना मा. आयुक्तांनी कार्यमुक्त केले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांच्या जागी प्रभारी कोणला दिलेले आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

प्रभारी शहर अभियंता हे पद श्री. शिवाजी बारकुंड यांना दिलेले आहे. आणि श्री शरद बेलवटे, लेखाधिकारी यांच्याकडे प्रभारी मुख्य लेखापरिक्षकांचे काम आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ज्यांना पदभार दिला त्यांनी चार्ज घेतला की नाही?

**प्रकरण क्र. ०३ :-**

महानगरपालिकेच्या सन २००७-०८ मधील मंजूर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील ''वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी करणे'' या लेखाशिर्षक अंतर्गत तरतुदीचे पुर्नःविनियोजन करणे

(सदरचा विषय मा. सभापती यांच्या आदेशानुसार तहकुब करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४, मा. आयुक्त सोा., यांनी शिफारस केलेल्या प्रस्तावर चर्चा करुन निर्णय घेणे. रुग्णवाहिका / शववाहिनी भाड्याबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, याच्यामध्ये वाहनांसाठी प्रशासकीय ठराव क्र. ०८, म्हणजे प्रशासकीय ठराव क्र. ०८ काय होता याची जेव्हा तुम्ही जेव्हा जुने ठराव दुरुस्ती करता तर जुने प्रशासकीय ठराव या सभेपुढे आले पाहिजे.

**एस. ए. खान :-**

वेटींग चार्ज पर हवर्स आहे की पूर्ण दिवस आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, याच्यामध्ये तुम्ही वाचन केले तर वर लिहले आहे की, प्रशासकीय ठराव क्र. ०८ दि. २६/०३/२००४ अन्वये रु. ७५/- इतके प्रति चार्ज शुल्क वेटींग चार्ज आकरण्यात येत आहे. आत्ता रु. ७५/- तासाचे की, दिवसाचे? खाली लिहलेले आहे रु. ७५/- दिवसाचे म्हणजे शेवटी प्रशासकीय ठरावामध्ये रू. ७५/- तासाचे आहे का? म्हणून मी विचारले की, प्रशासकिय ठराव काय म्हणतो. खाली प्रतीदिन लिहिले आहे आणि वर फक्त रू. ७५/- तासाचे होते की, दिवसाचे होते?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ते एका दिवसाचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एका वाहनाला बाहेर काढतांना रू. १००/- लागू होतात. या महापालिकेच्या कॉम्प्लेक्सच्या बाहेर निघाले कि, त्याला रू. १००/- मिनिमम चार्ज आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सन २००२ च्या प्रशासकिय ठरावामध्ये जे आहे. वेटींग चार्ज रू. ७५/- प्रतिदिन भाडे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही माहिती दिली की, प्रशासकिय ठराव कसा होता. म्हणजे चाराणे का मुर्गी और बाराणे का मसाला. दिन भर आदमी लेकर जाऐगा वेटींग मे रखेगा खुदका डिझेल डालेगा वेटींग मे रखेगा। इसका मतलब यह हो गया वेटींग रू. ७५/- अख्खा गाव फिरेल आणि रू. ७५/- येउन भरेल आणि डिझेलचे स्वतःचे २००/- रू. भरेल.

**मा. सभापती :-**

आत्ता आपण विचार करा की, रू. ५०/- ताशी ठेवायचे की रू. ७५/- ठेवायचे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे जो काही ठराव केला की, प्रत्येक याच्यात कॉन्ट्रॅक्टर रेट वाढवून मागतो. आपल्या ज्या गाड्या आहेत. बाहेरच्या बाजारात ज्या गाड्या चालतात त्याच्यापेक्षा किती रूपये कमी असावे. ही आपण लोकांची देणारी सेवा आहोत. म्हणजे ना नफा ना तोटा तत्वावरच आपण चालवतो. ब-याचशा वेळेला हजार रूपयाचे भाडे होते आणि पंचविस हजाराचे नुकसान होते. झालेले आहे. तुम्ही बाहेरच्या भाड्यांना सक्तीने मनाई करा. कारण आपली गाडी समजा दहा हजार रूपयांनी बाहेर गेली तर दोन दिवस, तीन दिवस, चार दिवस या शहरामध्ये नसते. ह्या गाड्यांचा कन्सेप्ट असा आहे की, इकडच्या स्थानिक लोकांना त्याचा फायदा झाला पाहिजे. एक गाडी सकाळी गेली की, बॉम्बेचे भाडे भरून दोन तीन तासात रिटर्न येते. म्हणजे ती गाडी डे ॲन्ड नाईट तीन ते चार भाडे मारते. ड्रायव्हर लोकांना

याची कल्पना नसते. कोण सांगलीला गेला, कोण साताऱ्याला गेला, कोण गुजरातला गेला. मागे चेन्नईला गाडी नेली होती. जवळ जवळ दहा बारा दिवस ती गाडी आणली नव्हती आणि आणली ती ठोकून आणली होती. तर ह्या गाड्या आपला स्टाफ घेउन गेला होता. कारण स्वस्त पडते. पण जो वाहन कक्ष आहे तिकडे या ठरावाची कॉपी नाही. त्यांचा संपुर्णपणे भ्रमणनिरास होतो की, काय रेट लाववा? काहीच कळत नाही. उठ सुठ गाड्या घेउन बाहेर चालला. आपल्याकडे गाडी नसते. वाहन विभागाला आपल्याकडे लॅन्डलाईन फोननंबर नाही. मा. महापौरांनी दिड-दोन महिन्यापुर्वी स्वतः आदेश दिले होते. अजुनपर्यंत वाहन विभागाने एक लॅन्डलाईन फोन ठेवला नाही. मी काशिमिऱ्याला किवा पेणकरपाड्याला राहतो. मला महानगरपालिकेची ॲम्बुलन्स पाहिजे. मी एक रूपया टाकून फोन करू शकतो की, ॲम्बुलन्स अव्हेलेबल आहे का? असेल तर मी येतो. आज तो माणूस तीस चाळीस पन्नास रूपये रिक्षाला खर्च करतो. रात्र असेल तर शंभर रूपये पण लागतात. आणि इकडे आल्यानंतर त्याला कळते की, ॲम्बुलन्स बंद आहे. ड्रायव्हर आलेला नाही. हि सुद्धा उत्तरे आम्हाला मिळाली आहेत. आत्ता तुम्ही भाडेवाढ करणार सगळ आहे. तुमच्याकडे कस्टमरच येणार नाही. तुम्ही भाडेवाढ करणार सगळे आहे. तुमच्याकडे कस्टमरच येणार नाही. तुम्ही लॅन्डलाईन याच्याकरिता की, तिकडे लॅन्डलाईन टेलिफोन पाहिजे. लॅन्डलाईन याच्याकरिता की, मोबाईल असेल तर रेंज तुटते, भेट होत नाही, माणसाचा कॉन्टॅक्ट होत नाही, आवाज ऐकायला येत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, याच्यात आणखीन एक सुधारण केली पाहिजे. जेव्हा आपण फोनवरून बुकींग मागतो की, ॲम्बुलन्स पाठवा तर त्यांचे असे म्हणणे आहे की, इकडे येउन फॉर्म भरा. एखाद्याला हार्ट अटॅक आलेला आहे. त्याने इकडे येउन फॉर्म भरायचा आणि नंतर वाहन निघणार. ही पद्धत कुठली आहे?

**प्रशांत पालांडे :-**

त्या ड्रायव्हरसोबत फॉर्म आपल्याकडे पाठवून द्यायचा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे नेहमी सांगतात की, फॉर्म भरा मग गाडी काढतो. म्हणजे आमचा मान ठेवतात असे मी सांगत नाही आम्ही फॉर्म भरतो पण तू इकडे येउन जा. पण ही पद्धत लावली असेल तर त्या पद्धतीमध्ये सुधारणा करा. एक तर त्या फोनवर जसे आपल्या फायर ब्रिगेडमध्ये नंबर येतात. त्यांना माहिती पडते की, कुठुन फोन आलेला आहे. तसा फोन आणा.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये सुविधा अशी करा की, त्या व्यक्तीचा पुर्ण ॲड्रेस वगैरे घ्या. कारण शंभर नंबरचा डायल चुकीचा घेतात. त्याचे बेनिफीट लहान मुल सुद्धा घेतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यात आणखीन एक खुलासा करा की, आम्ही फोन केला की, या ठिकाणी गाडी पाठवा. नगरसेवक म्हणून आम्हांला सांगतात की, तिकडे गाडी पाठवा. आम्ही फोन केल्यानंतर ती थकबाकी आमच्यावर काढतात. की तुम्ही फोन केला. तर ही पण ताकीद दया की, कोणीही नगरसेवकाने फोन केला असेल तर संबंधितांकडून ते वसूल करावे. नाहीतर ते आमच्यावर थकबाकी काढतात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब या ठरावामध्ये महापालिकेने बेवारशी बॉडया उचलण्यासाठी काय करावे. मागे असेच झाले. आमच्या इकडे बेवारशी बॉडया मी पोचवायला लावलेल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी शंभर रुपये भरले.

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेला आमच्याकडे तुमची थकबाकी दाखवली आहे. मी एखादयाला सांगितले की, तुम्ही ॲम्ब्युलन्स दया. तर ते भरायची माझी लायब्लीटी आहे. मी पाचशे पण भरले पाहिजे. पण बेवारशी बॉडी रस्त्यावर पडली आहे. त्याचीसुद्धा बिले आमच्याकडे घेउन येतात की, साहेब साडे तीनशे रुपये झाले, दोनशे रुपये झाले. आम्ही ते पैसे भरुसुद्धा. पण त्या ठरावामध्ये तसे लिहा की, बेवारशी शव उचलण्याकरिता. किंवा बेवारशी रुग्ण पोहोचवण्याकरिता. एखादा भिकारी आजारी आहे तो मरणान्मुख पडला आहे. नागरिक येउन आमचे डोके खातात. तुम्ही माणूस आहात की मस्करी आहे. तो मरायला पडला आहे. त्याला उचलून घेउन जायचे आहे. तो जर बेवारशी असेल तर त्याला तुम्ही सुट दया असे त्या ठरावात टाका. हा ठराव प्रशासनाने आणला पाहिजे. बेवारशी शवाची विल्हेवाट लावण्याकरिता आपल्याकडे तरतुद आहे. मा. आयुक्तांचे अधिकार आहेत. तो ठराव व्यवस्थित करुन आणा आणि ते रेट ठरवा.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बेवारस शवासाठी आपण त्याचा अंत्यसंस्कार खर्च करतो. त्याला जो काही कपडा लागतो, त्याला दहन करायचे असेल तर जो मजूरी लागतो ती महापालिका करते. त्याला बाहेरगावी कुठे घेउन जायचे असेल तर ......

**मिलन म्हात्रे :-**

बाहेरगाव नाही. तुम्ही ठाणे महानगरपालिका डयुटी करुन आले आहेत. ठाणे महानगरपालिकेमध्ये सगळ्यात जास्त ॲम्ब्युलन्स बेवारशी बॉडया नेण्या-आणण्याकरिता आहेत. त्या शववाहिनीमधून बेवारशी बॉडयाच नेतात.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे आपण प्रत्येक प्रभागाला एक ॲम्ब्युलन्स तैनात केलेली आहे. आणि त्यांच्यासाठी वेगळे फोन नंबर आणलेले आहेत. आणि दोन दिवसात त्याचे परिपत्रक काढून सर्व सदस्यांना त्यांचे नंबर देउ. आणि त्याची पब्लिसिटी करु. प्रत्येक प्रभागासाठी एक ॲम्ब्यूलन्स आणि एक सेपरेट फोनची प्रशासनाकडून...

**मिलन म्हात्रे :-**

प्रत्येक प्रभागासाठी?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रत्येक प्रभाग समितीसाठी आपल्याकडे जी प्रभाग कार्यालये आहेत, त्यांच्यासाठी?

**सुनिता पाटील :-**

चार प्रभागामध्ये चार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. श्री. खतगांवकर साहेब, आत्ता आपण बोलले की, त्यांना कपडा, वाहन महापालिका देते. ही बाब कोणत्याही अधिकाऱ्याला माहिती नाही. म्हणून तसे निर्देश दया की, बेवारशी प्रेत कोणामार्फत देणार? तर एक पोलिसांमार्फत किंवा एका नगरसेवकाने फोन केला तर. तशी त्यांना कल्पना दया. कोणालाही माहिती नाही की, आपली महापालिका खर्च करते.

**शानू गोहिल :-**

आम्हाला माहितीच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब समजा रेल्वेकडे बॉडी आली. ती बेवारशी आहे. ती टेंभावरून पोस्टमार्टम करुन तुमच्या स्मशानभुमीत दफनावायचे आहे. अशा सर्व्हिसेसकरिता ती बॉडी वाहून नेण्याकरिता आपण कुठलाही रेट लावू नये असे ठरावामध्ये नमुद करुन घ्या. ठाणे महानगरपालिकेत बेवारशी बॉडया नेण्याकरिता त्यांनी स्पेशल शववाहिन्याच घेतल्या आहेत. ठाणे सिव्हिलमधून ज्या बॉडया निघतात. त्यांच्या ट्रान्सपोर्टेशनचे काम त्या शववाहिन्या करतात. मी असे म्हणत नाही की, कामाकरिता शववाहिनी घ्या. पण याच्यात तुम्ही रिलॅक्सेशन दया. रेटचे काय फायनल झाले.

**प्रशांत पालांडे :-**

वाहन विभागाचे कोण अधिकारी आले आहेत का?

**शानू गोहिल :-**

हवर्स के हिसाब से होना चाहिए। नही तो सौ रुपये मे चार-पाच घंटा जाएगा ऐसा नही।

**तुळशीदास म्हात्रे :-**

आत्ता आपण वेटींग चार्ज रु. ५०/- ठेवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही बोलले की, मुंबईला गाडी गेली की, किलोमीटर फिरते. आत्ता आपण फक्त मुंबई लिहिले आहे. म्हणजे मुंबई आणि ठाणे असा याच्यात उल्लेख करा.

**नयना म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये मुंबईचा उल्लेख करा.

**शानू गोहिल :-**

बडे बडे हॉस्पिटल सब बॉम्बे के साईड मे ज्यादा है।

**मिलन म्हात्रे :-**

मुंबई असे नाही. वाहन सुरु झाल्यावर हा रेट नक्की राहिल. काही लिहू नका. मी भाईंदरला नेउन चार तास ठेउन देईन. वाहन सुरु झाल्यापासून सर्वत्र ठिकाणी. तो वेटिंग चार्ज पर हवर आहे, पर डे आहे, काय आहे?

**मा. सभापती :-**

पर हवर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पर हवर पंच्याहत्तर रुपये आहे?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी माहिती देउ इच्छितो, २००२ च्या प्रशासकीय ठरावात रु. ७५/- प्रती दिन आहे.

**मा. सभापती :-**

पर हवर करायचे आहे. शंभर रुपये प्रति तास केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

शंभर रुपये प्रति तास परवडणार नाही. पन्नास रुपये करा.

**मा. सभापती :-**

चार रुपये प्रति किलोमीटर.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पाच करा.

**मिलन म्हात्रे :-**

पाच रुपये बरोबर आहे.

**मा. सभापती :-**

सहाला, साडे पाचला बाहेर मिळते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य श्री. म्हात्रे साहेब, याच्यामध्ये तुम्ही कमाई करु नका. चार रुपये आहेत ते राहू दया.

**मिलन म्हात्रे :-**

नगरसेवकांना तुम्ही फिक्स रेट ठेवता मग कर्मचाऱ्यांना पण पाहिजे. कर्मचारी, नागरिक, नगरसेवक सर्वांना एकच रेट राहील.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

चार रुपये प्रति किलोमीटर आणि वेटींग चार्ज प्रति तास पन्नास रुपये.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वेटींग चार्ज पन्नास रुपये करा आणि ठाण्याच्या बाजूला मुंबई करा.

**मिलन म्हात्रे :-**

मुंबई, ठाणे लिहू नका. वाहन सुरु झाल्यावर सर्वत्र ठिकाणी लागणारा दर. कुठली ठिकाणे टाकू नका. मिरा भाईंदरमध्ये तुम्हाला मी पैसेच भरणार नाही.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला फक्त ठाणे इथे पाठवायचे. बाहेर पाठवायचे नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मुंबई आणि ठाणे हे कार्यक्षेत्र घ्या.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या ठरावात दोन बाबी होत्या. त्या मान्य केल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर, ठाणे आणि मुंबई हे स्पेसिफिक करा.

**मा. सभापती :-**

प्रति किलोमीटर चार रुपये, ताशी पन्नास रुपये. ठाणे ते मुंबई जाण्यासाठी मर्यादित असणार.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, शहरांच्या या व्यतिरिक्त नेण्यास बंदी आहे.

**मा. सभापती :-**

शहराच्या बाहेर कोणीही अधिकाऱ्यांने दिल्यास आठ रुपये प्रती किलोमीटर दराने त्यांच्याकडून पैसे वसूल करण्यांत येतील. कोणीही ॲम्ब्युलन्स किंवा शववाहिनी ठाणे आणि मुंबई सोडून पाठवली तर त्या अधिकाऱ्याकडून पैसे वसूल केले जातील.

**नगरसचिव :-**

सुचक कोण?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

वाचून कायम करण्यात आला.

**प्रकरण क्र. ०४ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणे. रुग्णवाहिका, शववाहिनी भाडयाबाबत. (वाहन विभाग)

**ठराव क्र. ०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णवाहिका व शववाहिनी वाहनांसाठी प्रशासकीय ठराव क्र.८, दि.२६/३/२००२ अन्वये रु.७५/- इतके प्रतिक्षा शुल्क (वेटींग चार्ज) आकारण्यात येत आहे. सदर ठरावानुसार उक्त भाडे आजपर्यंत रुग्णवाहिका व शववाहिनी वापरणारे नागरीकांकडुन वसुल करण्यात येत आहे.

महानगरपालिकेकडे सध्या दोन शववाहिनी व दोन रुग्णवाहिका कार्यरत आहेत. रुग्णवाहिका/शववाहिनी चे सध्याचे प्रतिक्षा शुल्क (वेटींग चार्ज) रु.७५/- हे नाममात्र असल्याने ही वाहने भाडयाने नेणारे नागरीक काही वेळा वाहने

नेऊन कमी कालावधी असेल तरी पुर्ण दिवस वाहन थांबवुन ठेवतात. त्यामुळे इतर नागरीकांना या अत्यावश्यक सेवेपासुन वंचित रहावे लागते व नागरीकांना इतर न परवडणा-या खाजगी सेवांकडे जाणे भाग पडत. करीता सध्याचे रु.७५/-(प्रतिदिन) प्रतिक्षा शुल्क प्रति तास रु. ५०/- प्रमाणे आकारल्यास वाहन घेऊन जाणारे नागरीक वाहनास जास्त वेळ थांबवणार नाहीत व इतर नागरीकांना वाहनाचा उपयोग घेता येईल. तसेच शववाहिनी हे वाहन महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर जात असल्याने स्थानिक नागरीकांना सेवेपासुन वंचित राहावे लागत आहे. तरी शववाहिनी या वाहनाची सेवा मिरा भाईंदर ठाणे व मुंबई जिल्हयापुरती मर्यादीत ठेवणेत यावी. तसेच सदर वाहने जर वरील क्षेत्राबाहेर गेल्यास संबंधीत वाहन पाठवणा-या कडुन रु.८/-प्र.कि.मी. प्रमाणे वसुली करण्यात यावी शववाहिनी /रुग्णवाहिका प्रतिक्षा शुल्क (वेटिंग चार्च) प्रतितास रु. ५०/- इतके आकारणेस व शववाहिनी /रुग्णवाहिका प्रति कि.मी. ४/- प्रमाणे सर्व नागरीक, नगरसेवक, कर्मचारी इ.यांचे करीता आकारण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान. अनुमोदनः- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**
प्रकरण क्र. ०५ मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांना मंजूरी देणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
त्या ठरावामध्ये लिहिलेले आहे.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
पहिल्यांदा ठराव वाचू दया.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
पण टिपणी चुकीची दिलेली आहे. एन्टरप्रेरणा यांनी वाटाघाटीअंती सादर केलेले दर. कुठले दर सादर केले?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त साो. ):-**
निविदा मागवल्यानंतर परत वाटाघाटीसाठी बोलावले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
बोलवल्यानंतर जे दर कमी झाले ते कुठे आहेत? ते तुमच्याकडे दिलेले आहेत. आमच्याकडे दिलेले नाहीत. आमच्याकडे दर नाहीत म्हणून विचारतो.

**शरद पाटील :-**
गोषवारा अपूर्ण आहेत.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
त्याच्यामध्ये दोन गोषवारे आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
आम्हांला एकच दिला आहे.

**शरद पाटील :-**
मा. सभापती महोदय, मा. उपायुक्त साहेब, हा गोषवारा आम्हांला दिला आहे त्याची प्रिंटीग बघा. वाचायला जमत नाही.

**नगरसचिव :-**
नवीन पान दिले आहे.

**शानू गोहिल :-**
नविन पान तुम्ही दिले आणि गोषवारा आम्हांला चार पाच दिवस अगोदर मिळाला.

**शरद पाटील :-**
समजून आला नाही आणि वाटाघाटीसाठी बोलवल्यानंतर काय केले त्याचा इथे उल्लेखच नाही.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
याच्यामध्ये तुम्ही ज्या वाटाघाटी केलेल्या आहेत. कोणाच्या निविदा होत्या काय दर होते ती सगळी माहिती सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

या अगोदर आमच्याकडे सगळी डिटेल माहिती यायची आम्ही बरेचसे सदस्य जुने आहेत. एक कोष्टक यायचे की, या निविदाकाराने एवढे भरले. डिफरन्स एवढा होता. एवढया डिफरन्समध्ये आम्ही थोडे निगोसिएशन करण्याकरिता बोलावले. हे सगळे पाहिजे. हे काहीच दिलेले नाही.

**शानू गोहिल :-**

मा. सभापती साहेब, सध्या आपल्याकडे किती वाहने आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

आणि याच्यावर सही नाही. चार्ज कोणाकडे आहे? मग त्यांच्या सहीने पाठवायचा होता.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सा़े.) :-**

आत्ता माझ्याकडे चार्ज आहे. तो गोषवारा पूर्वी पाठवलेला होता.

**एस. ए. खान :-**

पुढच्या वेळेला तुमच्या सहीने पाठवा.

**शानू गोहिल :-**

सचिव साहेब कॉपी बरोबर नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यामध्ये प्रतिदिन म्हणजे रात्री बारा वाजल्यापासून दुस-या बारा वाजेपर्यंत की सकाळपर्यंत?

**एस. ए. खान :-**

डिटेल पाहिजे, किती गाडया आहेत? कोणते अधिकारी वापरतात आणि कोणाकोणाला आपण देउ शकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण शासकीय जसे रात्री बारा वाजल्यापासून दुस-या बारा वाजेपर्यंत चोवीस तास पकडतो. म्हणजे रात्री बारानंतर दुसरा दिवस सुरु झाला.

**शरद पाटील :-**

साहेब, या गाडया किती आहेत? कोण अधिकारी वापरतात? आणि त्या वापरत असतांना आपण अधिका-यांनी स्वतःची गाडी असेल तर आपण तेरा हजार रुपये देतो. मग अधिका-यांनी स्वतःची गाडी घेउ दया. कशाला आपण वीस, बत्तीस आणि तेहतीस हजार रुपेय दयायचे. याचे कारण काय? अधिका-यांनी स्वतःची गाडी वापरावी. आपण त्यांना तेरा हजार देतो. तेरा हजारामध्ये काम होत असेल तर तेहतीस हजार कशाला दयायचे?

**मिलन म्हात्रे :-**

या विषयपत्रिकेमध्ये जेवढया ए.सी. गाडया आहेत त्या बाद करा. मा. सभापती साहेब कुठल्याही ए.सी.गाडया मागवू नका. नॉन ए.सी.पाहिजे.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब, ए.सी. गाडया असू दया किंवा नॉन ए.सी. असू दया. पण जर ठेकेदारांना देतो त्यांनी एकोणीस हजार रुपये सांगितले मग तेरा हजारात त्यांची स्वतःची गाडी घेउन त्यांनी वापरावी.

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेच्या गाडयांचा तपशिल काय आहे? किती गाडया आहेत? किती बंद पडल्या आहेत.

**मा. सभापती :-**

आपण तेरा हजार देतो. ड्रायव्हर आपला असतो.

**शरद पाटील :-**

ड्रायव्हर त्यांचा स्वतःचा. अधिका-याने गाडी घेतली तर ड्रायव्हर, डिझेल पेट्रोल सगळे स्वतःचे.

**मा. सभापती :-**

तेरा अणि ड्रायव्हरला पाच दिले तर अठरा झाले.

**शरद पाटील :-**

ते त्या अधिका-यांनी बघायचे आणि आपण एकोणीस हजार देतो ते सगळे आपलेच असते पण अधिकारी गाडी विकत घेतो आपण तेरा हजार रुपये देतो. मग आपल्याला तेरा हजार चांगले की एकोणीस हजार चांगले?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्तांनी ऑलरेडी निर्णय केलेला आहे.

**मा. सभापती :-**

आत्ता मला गाडी नको. ही गाडी प्रशासनच चालवणार. मग काय?

**शरद पाटील :-**

आपल्या नगरपालिकेच्या ज्या गाडया आहेत. मा. आयुक्त, उपायुक्त आणि कुठच्या डिपार्टमेंटला गाडया आहेत, त्या पालिकेच्या आहेत. आपला असा ठराव झालेला आहे की, जर कुठल्या अधिका-याने गाडी घेतली तर त्याला तेरा हजार रुपये दयायचे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब म्हणतात की, एखादयाला गाडी नको असेल तर काय करायचे?

**शरद पाटील :-**

त्यांना तुम्ही सक्तीच करा.

**एस. ए. खान :-**

त्याच्यामध्ये लोनपण फेडू शकतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

स्वतःची गाडी होईल आणि पालिकेचे पैसे वाचतील.

**शरद पाटील :-**

अधिकारी नाही म्हणत नाहीत. उलट ते म्हणतात की आम्ही स्वतःची गाडी घेतो.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या विषयामध्ये जी वाहने भाडयाने घ्यायची आहेत. एकूण अठरा वाहने आहेत. त्यामध्ये प्रभाग अधिकारी, टाटा सुमो वाहन, क्षेत्रिय अधिकारी, टाटा सुमो वाहन-०४, मुख्य आरोग्य निरीक्षक-०२, विद्युत विभाग-०१, वाहन विभाग-१, आरोग्य केंद्रासाठी-५, विधी अधिकारी-१, संगणक विभाग-०१, जाहिरात विभाग-०१, परवाना विभाग-०१ अशी अठरा वाहने टाटा सुमो दिलेल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आरोग्य विभागाची पाच वाहने कोणाकडे आहेत?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पल्स पोलिओ, डॉक्टर्स आणि जी शासकीय कामे आहेत त्याच्यासाठी पाच वाहने त्यांनी प्रस्तावित केली आहेत.

**शरद पाटील :-**

तुम्ही ही वाहने वाचून दाखवली. याच्यामध्ये कोण अधिकारी स्वतःची वाहने वापरतात? स्वतःची वाहने घेतलेली, साडे तेरा हजार घेणारे किती अधिकारी आहेत?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यामध्ये आरोग्य केंद्राला पाच गाडया कशाला पाहिजे?

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.):-**

याच्यामध्ये जे नमुद आहे. ते इंडिव्हिज्युअलसाठी नाही. त्यांच्याबरोबर अधिकारी असतील, त्याच्या अनुषंगाने ते आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आरोग्य केंद्राचे डॉक्टर सकाळी नउ वाजता येतात आणि संध्याकाळी सहा वाजता निघून जातात. त्यांची त्या आरोग्य केंद्रावर आठ तासाची डयुटी आहे. त्यांना कुठे व्हिजीट करायला लागत नाही. त्यांना गाडी कशाला?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला कल्पना आहे की पल्स पोलिओ त्यांचे राष्ट्रीय कार्यक्रम...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळी वेगळी गाडी घेतो. ते अधिकारी वेगळे आहेत. तुम्ही या पाच गाडया कमी करा.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब माझे असे म्हणणे आहे की, आपल्या ज्या अधिका-यांच्या स्वतःच्या गाडया असतील त्यांना तेरा हजार रुपये दया.

**शरद पाटील :-**

साहेब तेरा हजार पाचशे घेउन किती अधिका-यांच्या गाडया आहेत?

**शानू गोहिल :-**

त्यांना त्यांची गाडी वापरायला सांगा. त्यांचा पेट्रोलचा जो काही खर्च आहे. तो महापालिका देईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब या प्रस्तावाला मंजूरी देताना किती गाडया...

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अठरा गाडया.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता आपण पाच कमी केल्या. त्याच्यामध्ये बारा की तेरा गाडयांचा उल्लेख करा.

**मिलन म्हात्रे :-**

ए.सी. गाडया की नॉन ए.सी.?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ए.सी. नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तसे त्यात लिहा. ए.सी. कॅन्सल केले का?

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रस्तावितमध्येच ए.सी. नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब कोष्टक बरोबर वाचा. त्याच्यातल्या आठ ए.सी. गाडया आहेत. मी चेक केल्या आहेत.

**एस. ए. खान :-**

डिटेल घ्या. डिटेल आल्यानंतर मंजूर करा.

**शानू गोहिल :-**

डिटेल घेउन विषय घ्या.

**शरद पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, सगळ्या नॉन ए.सी. आहेत का? हे एका वाक्यात पूर्ण करा.

**श्री. बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जरी ए.सी.चे दर मागवले तरी सभागृह नॉन ए.सी. मंजूर करते. म्हणून सगळे नॉन ए.सी. घेतले.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये ए.सी. नको. सगळ्या नॉन ए.सी. ठेवा.

**शरद पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, अधिका-यांच्या किती गाडया आहेत ते आम्हाला सांगा.

**ओमप्रकाश दिवटे :-**

साडे तेरा हजार रुपये घेउन स्वतःच्या गाडया वापरणारे चार अधिकारी आहेत.

**नयना म्हात्रे :-**

त्यांची नावे सांगा आम्हांला.

**शानू गोहिल :-**

त्यांची नावे सांगा.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब आरोग्य विभागावर अन्याय का? त्यांच्या पाचच्या पाच सगळ्या गाडया काढून घेतल्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांच्याकडे आहे.

**एस. ए. खान :-**

अधिका-यांकडे गाडी आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आरोग्य विभागामध्ये कोणाकडे गाडी आहे?

**मिलन म्हात्रे :-**

मी तर म्हणतो, तुम्ही प्रभाग अधिका-यांना गाडया देउ नका. त्यांना मानधन पण देउ नका. प्रभाग अधिकारी कोणत्याही चौकीवर फिरत नाहीत. आमच्याकडे आरोग्याचे रजिस्टर आम्हाला प्रभाग अधिका-यांच्या कार्यालयात पाठवावे लागतात. आमच्याकडे चौकी आहे. नगरसेवक, ठेकेदार, एस.आय. वगैरे सर्वांच्या सह्या होतात. पण एकएक महिना प्रभाग अधिका-यांची सही नसते. तिकडची गार्डन्स आहेत किंवा इतर गटारे आहे, आरोग्याची चौकी आहे. प्रभाग अधिका-यांची कुठेही फेरी नसते.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, आपण सगळ्या प्रभागाच्या अधिका-यांना इथे मिटींगला बोलवता? आमचा प्रभाग क्रमांक किती आहे?

**मा. सभापती :-**

अठरापैकी पाच गाडया कमी करुन तेरा नॉन ए.सी. गाडयांना मंजूरी देण्यांत येत आहे.

**शानू गोहिल :-**

मा. सभापती साहेब कोणता अधिकारी किती वाहने वापरतो त्याची माहिती आम्हांला दया.

**मा. सभापती :-**

अभी दिया ना?

**शानू गोहिल :-**

कभी दिया?

**शरद पाटील :-**

साहेब, अजून दिली नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कोणत्या चार लोकांच्या गाडया आहेत ती माहिती दया.

**शरद पाटील :-**

साहेब, अधिका-यांच्या स्वतःच्या गाडया किती आहेत त्याची आणि ज्या आत्ता गाडया दिल्या त्या कोणकोणत्या अधिका-यांना दिल्या त्याची माहिती आम्हांला पाहिजे. ती उदया दिली तरी चालेल.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचा वर्ग किती आहे ते पण पाहिजे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०४ चा ठराव मगाशी टाईप केला तो वाचायचा आहे.

**एस. ए. खान :-**

(सन्मा. सदस्य ॲड. एस.ए. खान यांनी प्रकरण क्र. ०४ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

प्रकरण क्र. ०४ :- मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणे. रुग्णवाहिका, शववाहिनी भाडयाबाबत. (वाहन विभाग)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णवाहिका व शववाहिनी वाहनांसाठी प्रशासकीय ठराव क्र.८, दि.२६/३/२००२ अन्वये रु.७५/- इतके प्रतिक्षा शुल्क (वेटींग चार्ज) आकारण्यात येत आहे. सदर ठरावानुसार उक्त भाडे आजपर्यंत रुग्णवाहिका व शववाहिनी वापरणारे नागरीकांकडुन वसुल करण्यात येत आहे.

महानगरपालिकेकडे सध्या दोन शववाहिनी व दोन रुग्णवाहिका कार्यरत आहेत. रुग्णवाहिका/शववाहिनी चे सध्याचे प्रतिक्षा शुल्क (वेटींग चार्ज) रु.७५/- हे नाममात्र असल्याने ही वाहने भाडयाने नेणारे नागरीक काही वेळा वाहने नेऊन कमी कालावधी असेल तरी पुर्ण दिवस वाहन थांबवुन ठेवतात. त्यामुळे इतर नागरीकांना या अत्यावश्यक सेवेपासुन वंचित रहावे लागते व नागरीकांना इतर न परवडणा-या खाजगी सेवांकडे जाणे भाग पडत. करीता सध्याचे रु.७५/-(प्रतिदिन) प्रतिक्षा शुल्क प्रति तास रु. ५०/- प्रमाणे आकारल्यास वाहन घेऊन जाणारे नागरीक वाहनास जास्त वेळ थांबवणार नाहीत व इतर नागरीकांना वाहनाचा उपयोग घेता येईल. तसेच शववाहिनी हे वाहन महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर जात असल्याने स्थानिक नागरीकांना सेवेपासुन वंचित राहावे लागत आहे. तरी शववाहिनी या वाहनाची सेवा मिरा भाईंदर ठाणे व मुंबई जिल्हयापुरती मर्यादीत ठेवणेत यावी. तसेच सदर वाहने जर वरील क्षेत्राबाहेर गेल्यास संबंधीत वाहन पाठवणा-या कडुन रु.८/-प्र.कि.मी. प्रमाणे वसुली करण्यात यावी शववाहिनी /रुग्णवाहिका प्रतिक्षा शुल्क (वेटिंग चार्च) प्रतितास रु. ५०/- इतके आकारणेस व शववाहिनी /रुग्णवाहिका प्रति कि.मी. ४/- प्रमाणे सर्व नागरीक, नगरसेवक, कर्मचारी इ.यांचे करीता आकारण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचा एरिया?

**एस. ए. खान :-**

ठाणे आणि मुंबई लिहीला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर, ठाणे आणि मुंबई असे पाहिजे.

**शानू गोहिल :-**

मिरा भाईंदरचा उल्लेख करा.

**एस. ए. खान :-**

मिरा भाईंदर, ठाणे व मुंबईपुरती सेवा मर्यादित राहिल असे लिहिले आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०५ वर मा. सभापतींनी डिसीजन दिलेले आहे.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

एखादया गृहस्थाली, अधिकारी सोडून दुसरी पार्टी आहे, ते आठ रुपये भरून गाडी नेणार असेल तर ते देता येईल का?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आउट साईडला गाडया पाठवू नका. फार लॉस करुन आणतात.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.०५ वर तेरा गाडया असाव्यात असे साहेबांनी डिसीजन दिले आहे.

**शरद पाटील :-**

तेरा गाडया दिल्या आहेत. पण त्याची माहिती आम्हांला आली पाहिजे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०५ ला साहेबांनी मंजूरी दिली आहे. त्याला सुचक कोण आहे?

**मिलन म्हात्रे :-**

तो ठराव व्यवस्थित तयार करा. त्याच्यामध्ये ए.सी. वगळण्यात येतो आणि ज्या अधिका-यांना तुम्ही भत्ता देता. तो देण्यात येउ नये. अधिकारी क्लास वन, क्लास टू आहे का? आत्ता अतिक्रमणचे पिउनच तामझाम करत राहतात. हातोडी वगैरे काढून घेउन जातात. त्या ठरावामध्ये ते इन्क्युड झाले पाहिजे की, जी गाडी आहे ती त्या पर्टीक्युलर अधिका-यानेच वापरली पाहिजे. आपल्या महानगरपालिकेची गाडी मी डहाणू-पालघर वगैरे साईडला हायवेवर बघितली. त्यादिवशी मड आयलँडला मिरा भाईंदर महानगरपालिकेची मारुती एस्टिम गाडी बघितली. त्यांनी जर खाजगी नेली असेल तर त्याला नेमप्लेट नाही लावली पाहिजे. मागच्या वेळेला हा विषय झाला होता. उदया तो लफडी करेल आणि एफ.आय.आर. मध्ये तुमचे नाव येईल. त्याने जर गाडी भाडयाला दिली नसेल तर त्याने नाही लावली पाहिजे. कारण त्याला मुंबईला सगळीकडे पार्किंगला व्यवस्था मिळते. ऑक्ट्रॉय माफ होतो. त्याने भाडयाच्या गाडया चालवायच्या आणि तुमची नेमप्लेट लावायची. शनिवार रविवार सुट्टी असेल तर गाडया चालत नाही. आम्ही बारमध्ये सुद्धा गाडया बघतो. ते कुठचे काम करायला गेले असतात? आम्हाला बाहेरचे लोक दाखवतात की, ही बघा तुमची गाडी बारमध्ये उभी आहे.

**शरद पाटील :-**

त्या ठेकेदारावर तशी सक्ती आणायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा जो नेम बोर्ड आहे तो ज्या दिवशी सुट्टी आहे त्या दिवशी तुमच्याकडे जमा झाला पाहिजे. त्या नेमबोर्डच्या पाठिमागे गाडीचा क्रमांक पाहिजे. तुम्ही हे करा. कधीतरी त्रास होईल त्या वाहनांचा दुरुपयोग होईल. तुम्ही आम्हाला ओळखपत्र दिले. त्याच्यामागे लिहिले आहे की, याचा दुरुपयोग करायचा नाही. मग तुम्ही जी वाहने भाडयाने घेता ती आस्थापनेवर आहेत ना? मग त्याचा दुरुपयोग झाला तर त्याचा ठरावामध्ये काहीच उल्लेख नाही. त्या वाहनाचा मिसयूज झाला नाही पाहीजे.

**नयना म्हात्रे :-**

मा. नगरसचिव त्या चार गाडया कोणाच्या आहेत त्यांनी नावे आम्हाला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या अधिका-यांच्या गाडयांमधून ऑक्ट्रॉय वाचवून माल येतो.

**प्रकरण क्र. ०५ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांना मंजूरी देणे. वाहने वाहन चालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाडयाने घेणे. सन २००७-०८ करिता वार्षिक ठेका निश्चित करणे. (वाहन विभाग)

(सदरचा विषय मा. सभापती यांच्या आदेशानुसार तहकुब करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०६ मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे महानगरपालिकेने खरेदी केलेल्या टाटा मॉडेल ४०७ (एस.एफ.सी) या वाहनावर रुग्णवाहिका व प्रेतवाहू वाहनाकरिता बॉडी बांधणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब हे अवलोकनार्थ आहे. पण याच्यामध्ये बॉडीसाठी जे चार लाख पंचावन्न हजार आणि चार लाख चाळीस हजार दिलेले आहे. म्हणजे शववाहिनी मध्ये काही नसते. पण ॲम्ब्युलन्स मध्ये सीट,स्ट्रेचर. ह्याच्यामध्ये काय काय देणार? फक्त बॉडी येणार की काय? त्याच्यामध्ये अन्य काही साहित्य देणार आहेत का?

**शरद पाटील :-**

तुम्ही प्रत्येक वेळेला आम्हांला डिटेल का देत नाहीत?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बॉडी म्हणजे फक्त पत्र्याची बॉडी येणार की, त्याच्यामध्ये सीट आहे कव्हर आहे. नाहीतर दुस-या दिवशी आणखीन एक मंजूरी. त्या साडे चार लाखामध्ये काय काय देणार आहेत? तुम्ही याच्यामध्ये दिले पाहिजे की, साडे चार लाखामध्ये ही वस्तू अपेक्षित आहे.

**शरद पाटील :-**

साहेब याच्यात पहिलेच दिले तर काय त्रास आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

परिवहन सभापतींनी गाडी आल्यानंतर त्याला एका वर्षामध्ये पावणे दोन लाख रुपयाचा फक्त मेन्टेनन्स आहे. गाडीची गॅरेंटी फक्त चार वर्षाची असते. त्याला सहा महिन्यामध्ये ऑईल चेंज वगैरेला पावणे दोन लाख रुपये खर्च, सीट कव्हरचा खर्च, सीट रिपेअरींगचा खर्च म्हणजे गाडी आल्यानंतर सहा महिन्यामध्ये खर्च झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

परिवहनचे सभापती उत्तनवरून आठ आठ लोक भरून आणायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा तुम्ही टिपणी देता त्याच्यात सांगा की साडे चार लाख रुपये कशाचे आहेत? त्या साडे चार लाखामध्ये काय काय देणार ते सांगा.

**नितिन मुकणे :-**

त्याच्यात दोन बाजूला सीट असतील. दोन स्ट्रेचर असतील.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची गाडी ताब्याता मिळाली आहे ते सांगा. तुम्ही स्वतः इंजिनियर आहेत. तुमचे डी.एम.सी. मला एकत्र घेउन गेले. पिटीशन फाईल केले म्हणून ते घेउन गेले की साहेब जरा आमच्या बरोबर चला. तुमच्या केसमुळे आम्हाला हे करावे लागले. त्यावेळेला तुम्ही नव्हते. तिकडे जाउन मी त्यांना सजेशन केले. आपल्या महापालिकेच्या वाहन विभागाचे मेकॅनिकल इंजिनियर म्हणून तुम्ही आलात तुमचे काही लागते की नाही? ही तुमची दुसरी चूक आहे. श्री. रणखांब साहेब असताना एक चांगली ॲम्ब्यूलन्स विकायचा प्रस्ताव तुम्ही तयार केला होत. श्री. रणखांब साहेबांनी स्वतः जाउन ती ॲम्ब्युलन्स बघितली. त्यानंतर सत्तर हजार खर्च केला आणि ती गाडी काही महिने चालली. ती गाडी ऑक्शनमध्ये काढा म्हणून तुमचा प्रस्ताव आहे. साहेब, वाईट एकच वाटते. हे तरूण आहेत. दोन गाडया आपल्या दिल्या आहेत त्या एकदाच येणार आहेत. मागे एकदा शववाहिनीवाल्याने काय केले होते माहिती आहे? पूर्वी जशी एस.टी.ला किंताणे लटकायची ती किंटाणे तो लावणार होता.

**मा. सभापती :-**

काय काय करायचे ते बोलू दया.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब याची माहिती डी.एम.एम.सी ने दयायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

या गाडीचे पैसे मंजूरी देण्यात येते. गाडी खाली आलेली आहे. जाउन सर्व सदस्यांनी बघून घ्यावी. काय कमी असेल तर मला सांगावे या मंजूरीला आम्ही मंजरी देतो.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही आत्ता रुलिंग दिले की काय कमी असेल ते करुन घेउ तर ते करुन देतील का?

**मिलन म्हात्रे :-**

घेतले नाही तर तुम्ही काय करणार? मागच्या वेळेला महापालिकेने ॲम्ब्युलन्स घेतली...

**शानू गोहिल :-**

आपण रद्द करु या.

**शरद पाटील :-**

माहिती येउ दया. पुढच्या मिटींगला घ्या.

**एस. ए. खान :-**

पुढच्या मिटींगला ठेवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य श्री. एस.ए.खान साहब वह अवलोकनार्थ है। मंजूरी देना पडता है। लेकिन इनको डिटेल देना चाहिए।

**एस. ए. खान :-**

जरुरी नही है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यामध्ये आणखीन एक चूक केली आहे. ४ लाख ५५ हजार प्रेतवाहू वाहनाकरिता ६ लाख ४० हजार इतके दर सादर केलेले आहेत. तसेच टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते युनायटेड ऑटोमोबाईल प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून सदर कामी टाटा ४०७ दोन चेसीस खरेदी केल्या आहेत. पण त्यांचे रेट नाही. म्हणजे त्याची मंजूरी घेतात. पण किती रुपयाला घेतली त्याची मंजूरी नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब या ठरावाला मंजूरी देताना खालचे पूर्ण वाचा.

**शरद पाटील :-**

साहेब अवलोकनार्थ चर्चा करायची नाही असे नाही. पण आमच्याकडे विषय आणलेला. आत्ता पुढे वाचा.

**मा. सभापती :-**

चर्चेच्या गोष्टी करत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या दोन्ही कामांच्या व्यतिरिक्त दोन टाटा चेसीज खरेदी केलेल्या आहेत. त्याचा उल्लेख आहे. त्याचे रेट नाहीत. प्रायव्हेट लिमिटेड, ऑथोराईज डिलर. पण किती रुपयामध्ये खरेदी केले? त्याची मंजूरी घेता पण त्याचे रेट आमच्याकडे नाहीत. उदया मंजूरी दिली...

**शरद पाटील :-**

याच्यात तो विषय आहे. त्याची किंमत दयायला पाहिजे.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

कंपनी चेसीजचे ओरीजनल चेसीस मिळणारच नाही. आलेल्या चेसीसवर बांधणी करण्याचे काम निविदा मागवून केले जाते आणि त्यांचे दर मागवून जी कार्यवाही केलेली आहे. ते अवलोकनार्थ ठेवलेले आहे.

**शरद पाटील :-**

तुमची आमची मंजूरी मागता आणि मा. महासभेचा काय संबंध? इथे मंजूरीला कशाला आणला?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हे आणले त्याला विरोध नाही. मागे एक ॲम्ब्युलन्स आणली त्याला स्टेपनीच नव्हती. म्हणजे ज्यावेळेस आपण गाडी ताब्यात घेतो त्यावेळेला काहीच करत नाही. मागे आपले फायर बिग्रेड बनवायला दिले. मी स्टॅण्डींगला मेंबर होतो. तेव्हा आम्ही बघायला गेलो. त्या संपूर्ण बॉडीला लोखंडी अँगल वगैरे. आपण वाहन विभागात जे तज्ञ म्हणून घेतो त्यांचे काम नाही का की, दहा लाखाची एक गाडी दिली आहे. मी इन्स्पेक्शनला येतो. बॉडीचे अँगल वेल्डींग झाल्यानंतर आम्हांला दाखवा, पत्रानंतर चढवा. सगळे स्क्रॅपमधले अँगल त्या गाडीला वापरले होते. त्याच्यानंतर लाईट नाही, सायरन नव्हता. फायर ब्रिगेडला काय काय अत्यावश्यक आहे ते तर बघा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हालासुद्धा माहिती आहे की, चेसीस आल्याशिवाय बॉडी बनणार नाही. मग याच्यात उल्लेख नाही केला पाहिजे. तुमच्याकडे फक्त चेसीस बांधायला दिले. आम्हांला वाटले की, या प्रस्तावामध्ये दोन वाहने खरेदी करतात.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची एक अशी लाईन पाहिजे की, मा. महासभा अमुक अमुक ठराव क्र. असा आणि विकत घेतलेल्या चेसीस रुपये एवढे एवढे याच्यावर बॉडी बांधणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तसा ब्रॅकेटमध्ये उल्लेख केला पाहिजे की, या ठरावामध्ये आलेली वाहने ऑलरेडी खरेदी केलेली आहेत. त्याच्यामध्ये चेसीस बांधायचे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब चेसीस आणताना कोणत्याही गॅरेजला गाडया टाकलेल्या असतात. ते टायर बदली करुन दुसरे टायर मारलेले असतात.

**मा.सभापती :-**

याच्यापुढे आपल्याला चारही प्रभाग समित्यांना रुग्णवाहिका ठेवायची आहेत. त्याची कधीही बॉडी मागवू नये. कंपनीकडून डायरेक्ट ॲम्ब्युलन्स मागवावी. त्याच्यात असलेल्या बॉडी करण्याची गरज नाही. डायरेक्ट कंपनीला चेक दिला जाईल. चारही प्रभाग समित्यांना आपण रुग्णवाहिका मागवणार आहोत त्या या पद्धतीने मागवा.

**मिलन म्हात्रे :-**

त्या ४०७ च्या मोठया बॉडया नाहीतर ते मुद्दाम छोटया मागवात आणि सांगतात की इकडे ही अव्हेलेबल नाही म्हणून आपल्याला ती द्यायला लागेल. ४०७ च्या मोठया रेडी मिळतात. ते आपल्याकडे कॅटलॉग घेउन येतात. अद्यावत सगळी मशिनरी आहे. म्हणजे तुमच्या आय.सी.यू. युनिटपासून सर्व. आणि महापालिकेने एक आय.सी.यू. युनिटची ॲम्ब्यूलन्स का घेउ नये.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्या मा. महासभेमध्ये मी प्रस्ताव दिला होता. पूर्वी आपल्याकडे डॉक्टर नव्हते. आत्ता पुष्कळ डॉक्टर भरलेले आहेत. त्याच्यामध्ये एखादा डॉक्टर एमर्जन्सीमध्ये गेला तर आपल्याला काही फरक पडणार नाही. आपल्याकडे डॉक्टर नव्हते म्हणून आपण ती गाडी घेत नव्हतो.

**मा. सभापती :-**

मंजूरी आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांना सांगा पद्धत सुधारा. डिटेल देत जा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हे रुलिंग दयाल. तर त्या ऑटोमोबाईल इंजिनिअरने काय करावे? वाहन विभागाच्या अधिकाऱ्याने काय केले पाहिजे. हे रुलिंग देउन आम्हांला निर्णय दया की, ठराव मंजूर की नामंजूर? शववाहिनी जी बनवली त्याला कुठे हॅन्डल असावेत? कुठे पडदे असावेत? कुठे एअर वेन्टीलेशन असावे हे आम्हाला जाउन दाखवावे लागेल. त्यांनी पडदे लावले होते.

**मा. सभापती :-**

आत्ता लावले आहेत का?

**एस. ए. खान :-**

आपण खाली जाउन बघू की, सगळे पूर्ण आहे की नाही. पुढच्या सभेमध्ये पास करु.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्या कंपनीच्या माणसाला इकडे बोलवा. त्या गाडीमध्ये काही फॉल्ट असेल तर कंपनीचा माणूस नोट डाउन करुन गाडी घेउन जाईल. त्या माणसाला बोलावून घ्या.

**एस. ए. खान :-**

काय डिफेक्ट राहिला असेल त्याची सुधारणा करुन घेउ.

**मा. सभापती :-**

नया गाडी मे डिफेक्ट क्या रहेगा?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मागे स्टेपनी नव्हती. टूलबॉक्स दिलेला नव्हता. दोन गाडया आपल्या तशाच आल्या.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजूर आहे की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

त्या कंपनीचा जो जबाबदार माणूस आहे त्याला बोलवा. त्या सुचनांना अधिन राहून तुम्ही मंजूरी दया.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्तांनी अवलोकन केले त्याला मी मंजूरी देतो.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या सुचनांना अधिन राहून मंजूरी देतो. उदया तो ऑटोमोबाईल इंजिनिअर बोलेल की आम्ही जाउ शकत नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब याला मा. आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. आपण फक्त बघायचे आहे.

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांना मी सांगतो की, याच्यापुढे मी विषय घेणार नाही. आपल्याला दोन-तीन मिटींगला आढावा घ्यायचा आहे. आपला टॅक्स किती आला? किती पाणीपट्टी आला त्याची धावपट्टी करायची आहे.

**प्रकरण क्र. ०६ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. महानगरपालिकेने खरेदी केलेल्या टाटा मॉडेल ४०७८ (एसएफसी) या वाहनावर रुग्णवाहीका व प्रेतवाहू वाहनाकरिता बॉडी बांधणे. (वाहन विभाग)

**ठराव क्र. ०३ :-**

महानगरपालिकेने दि. ३०/०८/२००७ रोजी दै.गावकरी व दै.जन्मभुमी या वृत्तपत्रात जाहिर केलेल्या निविदा सुचनेनुसार महापालिकेने खरेदी केलेल्या टाटा मॉडेल एस. एफ. सी. ४०७ या चेसीसवर रुग्णवाहिका व शववाहिनी करीता बॉडी बांधणेकामी मे. वाय. सी. स्पेअर्स, मे. मर्क्युरी मोटर्स, मे.शालीमार इंजिनिअरींग या तीन ठेकेदारांनी निविदा सादर केलेल्या आहेत.

निविदेतील तुलनात्मक तक्ता पाहता शववहिनी व स्त्रणवाहिका बॉडी बांधणेकरिता मे. मर्क्युरी मोटर्स यांचे दर सर्वात कमी आहेत. मे. मर्क्युरी मोटर्स यांनी रुग्णवाहिके करीता रु. ४,५५,०००/-व प्रेतवाहु वाहनाकरीता रु. ४,४०,०००/- इतके दर सादर केलेले आहेत. तसेच टाटा कंपनीचे अधिकृत विक्रते मे. युनीटेक ऑटोमोबाईल प्रा. लि. यांचेकडून सदर कामी टाटा ४०७ (एसएफसी) दोन चेसीज खरेदी केलेल्या आहेत तरी सदर निविदा स्विकारणेस व खरेदी केलेल्या टाटा दोन चेसीस याकामी ही सभा मंजुरी देत आहे. सदर कामी झालेल्या खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०७, मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. महानगरपालिकेतील सार्व. आरोग्य विभागाकरिता पियागो ॲपे थ्री व्हिलर टेम्पो आयटीपीवी पुरवठा करणे.

**एस. ए. खान :-**

याच्यामध्ये आपण औषध वगैरे मारण्यासाठी ठेका दिला आहे ना?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

ठेका पूर्वीचाच आहे. आपण त्याला फक्त साहित्य उपलब्ध करुन दयायचे.

**नयना म्हात्रे :-**

आपण कशाला साहित्य दयायला पाहिजे. त्यांचा करोडो रुपयांचा तो ठेका असेल. आपण त्यांना टेम्पो कशाला दयायला पाहिजे. आपण जर टेम्पो घेउन दिले तरी त्याच्यावर आपलेच ड्रायव्हर आहेत.

**शरद पाटील :-**

साहेब धूर फवारणीचे पंप पण ते आपलेच वापरतात. ते सगळी आपलीच अवजारे वापरतात. मग आपण त्यांना ठेका कसला देता?

**शानू गोहिल :-**

उनको टेम्पो दिया जाए की नही देता है। लेकिन मैं आरोग्य अधिकारी को पुछना चाहती हूँ। खास करके श्री. कांबले साहब को, मैंने उनको १९/११ को पत्र भी दिया है की, यह जो धुआ फवारणी होती है। वो सात दिन मे एक बार होती है। सात दिन मे एक फॉगींग करने है तो मच्छर मर जाते है। इसकी क्या गॅरेंटी है। आपके पास लेबोरेटरी टेस्ट रिपोर्ट है क्या? अपने पास इतनी असरदार दवाईयाँ है? मुझे श्री. कांबले साहब से जवाब चाहिए।

**मा. सभापती :-**

श्री. कांबळे साहेब, जवाब दया.

**राजकूमार कांबळे :-**

आपण आता ज्या चार ऑटोरिक्षा घेतलेल्या आहेत. त्या ऑटोरिक्षामध्ये आपल्याकडे पुर्वी पध्दत होती की, दहा लिटर पंप घेउन कर्मचारी प्रत्येक प्रभागात जात होता. आणि दहा लिटर संपल्यानंतर जिथ चौकी असेल तिथे जायचा त्यामुळे एका दिवसाला त्याला मॅक्झीमम  फवारणी  करता येत नव्हती.  त्यामुळे मा. आयुक्तांनी अशी कल्पना आणली की, काही महापलिकांमध्ये असे टेम्पो घेउन त्यावर पाचशे लिटरची टाकी आणि एक लिटर औषध मिसळुन ते आपण लांब लांब जिकडे फवारणी होउ शकत नाही. विशेष करुन नाले, किंवा बिल्डींगच्या मागच्या बाजुला अशा ठिकाणी फवारणी साठी शंभर फुट लांब पाईप त्याच्यावर लावलेले आहेत. त्यानुसार आम्ही ज्या ज्या ठिकाणी नाले किंवा मोठी गटारे आहेत. त्या ठिकाणी फवारणी करत आहेत.

**शानु गोहिल :-**

आपल्याकडे एका प्रभागात किती फवारणी होते?

**राजकुमार कांबळे :-**

राष्ट्रीय मलेरिया कार्यक्रमानुसार आपण जो प्रोग्राम बनवलेला आहे. त्या प्रोग्रामानुसार प्रत्येक वॉर्डमध्ये सात दिवसातुन एकदा फवारणी होईल.

**शानु गोहिल :-**

त्याचा बिलकुल असर होत नाही.

**राजकुमार कांबळे :-**

आता नियंत्रण करण्याचे आपले काम आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

श्री. कांबळे साहेब, शेणाचा डेपो असेल त्याच्यावर दिवसातुन किती वेळा फवारणी केली पाहिजे? आमच्या प्रभागामध्ये काही व्यावसायिक लोक बाहेरुन शेण आणतात. आणि ते सुकवतात. आणि त्याच्यापासुन ते उत्पन्न काढतात.

**राजकुमार कांबळे :-**

त्यांना आपण नोटीसा काढलेल्या आहेत. त्यांच्यावर पंचनामा करुन कार्यवाही करायची आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मलेरिया कशामुळे होतो?

**राजकुमार कांबळै :-**

मलेरिया डासांमुळे होतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मच्छरचे प्रमाण कमी होण्यासाठी तुम्ही सात दिवसातुन एकदा औषध फवारणी करता. पण रोजच्या रोज ज्या शेणाच्या लॉऱ्या येतात. त्याच्यावर काय निर्बंध घालता?

**राजकुमार कांबळे :-**

त्यांच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरु आहे. लवकरच त्यांच्यावर आम्ही गुन्हा दाखल करणार आहोत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

गुन्हा कधी दाखल करणार? तुम्हाला पत्र देउन एक महिना झाला.

**शरद पाटील :-**

किती वर्षे झाली तिथे चाललेले आहे आणि तुम्ही अजुन गुन्हाच दाखल करता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

एस.आय कधी फोन पण घेत नाहीत. कधी वॉर्ड मध्ये फिरत नाहीत.

**शरद पाटील :-**

श्री. कांबळे साहेब, तुम्ही व्हिजीट करता का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

श्री. कांबळे साहेब पण व्हीजीट करत नाहीत.

**शरद पाटील :-**

केबीन रोडचा नाला कधी निचरा होत नाही ते तुम्ही बघितले का?

**नयना म्हात्रे :-**

तुमच्या धुवाफवारणी औषध फवारणी बद्दल काही विरोध नाही. कारण मी स्वतः माझ्या वॉर्ड मध्ये फिरते. मला एवढेच सांगा. तुम्ही जे चार टेम्पो आणले ते आपण आणायला पाहिजे की, ठेकेदाराने आणले पाहिजे. आज आपण त्यांना चार टेम्पो आणून दिले. त्या एका टेम्पोची किंमत एक लाख चाळीस हजार रूपये आहे. त्याच्यावर ड्रायव्हर देखील आपले आहेत. मग आपण ज्या माणसाला करोडो रूपयांचा ठेका दिला त्याची तर चांदी झाली. आज एका कामगाराचा पगार साडेतीन चार हजार पकडला तर किती हजार झाले? त्या तलावारने तो पगार द्यावा. आपण कशाला द्यायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांचे पगार तलवारने द्यावे.

**शरद पाटील :-**

आपण त्याला टेम्पो कशाला देतो?

**एस. ए. खान :-**

आपण टेम्पो कशाला देतो? टेम्पो पण नाही दिले पाहिजे.

**शरद पाटील :-**

त्याला ठेका फक्त औषध फवारणीचा दिवस आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यामध्ये मी खुलासा करतो सन्मा. आयुक्त साहेबांनी याठिकाणी कॉन्फरेन्स होता आणि इतर महापालिकांचे कॉन्फरन्स झाले की, आधुनिक पद्धतीने इक्वीपमेंट लावून अशी मशिनरी लावून केले तर ते काम चांगल्या पद्धतीने होउ शकते आपल्याकडे श्री. तलवार यांना वार्षिक ठेका ऑलरेडी दिला होता आणि ती त्यांची जबाबदारी होती. त्याच्यामध्ये फक्त हे ॲडीशनल वाहन गटनेत्यांची बैठक घेउन चर्चा करून घेतलेले आहेत. तर हे वाहन घेत असताना वाहनाचा जो खर्च होतो तो त्याला करायला लावू आणि पुढच्या वर्षीसुद्धा त्या वाहनाची मालकी आपण राहणार आहे.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, वाहन आपल्या पैशाने घेतले म्हणजे ते आपलेच आहे. पण सध्या आपण त्या तलवारची सुविधा करून देतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण नागरिकांसाठी करतो.

**नयना म्हात्रे :-**

नागरिकांसाठी आपण करोडो रूपयांचा ठेका दिलेला आहे.

**शानु गोहिल :-**

कॉन्ट्रॅक्ट पद्धती तुम्ही बंद करा.

**मा. सभापती :-**

गटनेता का मिटींग हुआ। उसमे तुमलोगोने पास किया।

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, गटनेत्यांच्या मिटींगमध्ये पास कसे करणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांनी माहिती दिली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते काम झालेले आहे. ते करत असताना त्यांनी माहिती देउन केलेले आहे. पास करण्याचा विषय नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ते टेम्पो आणले त्यांचे चार दिवसात पंप खोलले. ते पितळेचे पंप खाली खोललेले होते. ते पंप खाली पार्ट करून ठेवलेले आहेत. कसले टाळे नाही काही नाही. आम्ही उघडून बघितले तर सगळे पार्ट खुल्ले. सिक्युरिटीची टाळा, चावी काही नाही. म्हणजे आपले एस. आय. म्हणा किंवा आपले अधिकारी जवळ जवळ चार टेम्पो एक बावीसशे पकडा तुम्ही चाळीस बोलता. पंधरा त्रिक पंचेचाळीस, साडे-चार-पाच लाखाचा माल खाली उघड्यावर पडला आहे. त्याचे सगळे खोलून ठेवले आहे. मी सिक्युरिटीवाल्याला जाउन सांगितले कमिशनर साहेबांना सांगितले की, साहेब हे सगळे पंप खोलले आहेत. त्याचे नोझल गेले, त्याचे पिस्टल गेले तरी ते बाद झाले. आणि त्या पंपची पावर बिलकूल नाही.

**राजकूमार कांबळे :-**

आत्ता नाही पूर्वी.

**मिलन म्हात्रे :-**

पूर्वी नाही. गाडी आली. उद्घाटन झाले नव्हते त्याच्या अगोदरची गोष्ट आहे.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

बरोबर आहे. त्यावेळेला असेम्बल झाली नव्हती.

**मिलन म्हात्रे :-**

असेम्बल नाही. गाडी डेमो दाखवल्यानंतर मी स्वतः नारळ फोडला. मी स्वतः काम चालू केले. मी माझ्या हाताने औषध मारले आहे. त्यानंतर ती गाडी खोलली आहे. काहीतरी माहिती नसेल तर वाटेल ते बडबडू नका. खाली जाउुन बघितले पाहिजे. त्या गाडया रात्रभर बेवारश्यासारख्या पडलेल्या होत्या.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आत्ता आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

आत्तासुद्धा जाउन त्याची परिस्थिती बघा. तुमच्या एस.आय.ने बघितले का? साहेब, तुमची गाडी परवा माझ्याकडे आली होती. तुम्हाला सुचना केली त्यावेळेला तुम्ही हजर होते. पण एकाही अधिकाऱ्याला वाटले नाही की, एक नगरसेवक येउन बोलतो. खाली पाच लाखाचा माल उघड्यावर पडला आहे. एकाही अधिकाऱ्याला जाणीव झाली नाही की, जाउन बघावे. तुम्हाला कमी वाटते का? तुम्ही तुमचे काम व्यवस्थित करा. आम्हाला बोलायची गरज नाही. श्री. कांबळे यांनी व्यवस्थित सर्व्हे केला फिरले वगैरे तर आम्ही या सभेत बोलणार नाही. तीन ते चार वर्षापासुन आम्ही बोंबलतो. हे नगरसेवक बोलतात तिकडे घाण साचली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या विषयावर चर्चा करा. ह्या मुद्दयांवर चर्चा करू नका.

**मिलन म्हात्रे :-**

तोच विषय आहे. अधिकाऱ्यांना थोड्या वेळापुर्वी तुम्ही वहाने देता. कशासाठी देतो? सर्व्हीस चांगली मिळावी म्हणून वाहने. अधिकारी जर घराच्या बाहेर पडत नसेल, ऑफीसच्या बाहेर पडत नसेल, मोबाईल स्विच ऑफ असतात. ही कसली सेवा आली आज ती गाडी आहे तीचे पाईप लिकेज आहेत. तुमच्या मते तो किती प्रमाणात औषध टाकतो हे तुम्हाला माहिती आहे का? ते कोणी बघायचे त्याच्यामध्ये औषध टाकतो की, पाणी फवारतो हे कोणी बघायचे? नगरसेवकाने ते औषध टाकतात त्याचा वास येत नाही. सन्मा. श्री. शिवमुर्ती नाईक होते त्यांनी डायरेक्ट कंपनिला काम दिलेले. त्यावेळेला.......

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. उपायुक्त साहेब, मला एक सांगा एस.आय. ची ड्युटी काय?

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेला कंपनीकडून अधिकारी यायचे ते डेमो द्यायचे आणि त्यावेळेला हे अधिकारी रस्त्यावर फिरायचे. त्यावेळेला चीफ ऑफीसर दर्जाचा माणुस असतांना एस.आय रस्त्यावर फिरायचे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण ज्या सुचना करता. त्या सुचना ज्या कामासाठी करता त्या इंत्यभुत सुचना केल्या होत्या. त्याची अंमलबजावणी चालु आहे.

**शरद पाटील :-**

मा. श्री. खतगावकर साहेब, आम्ही प्रत्येक वेळेला सांगतो. पण त्या औषधामध्ये बदल होत नाही. ते औषध पहिले चांगले मारतात. म्हणजे नगरसेवक जोडीला असतांना बरोबर असते. पण त्याच्यांनंतर त्या औषधामध्ये दम नाही. आणि याच्यात काडीमात्र शंका नाही. की तुमची औषधे चांगल्या दर्जाची नाहीत त्याच्यात किती मिक्सींग करतात ते तुम्ही बघता की, नाही ते आम्हाला माहित नाही जसे सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे यांनी सांगितले की दवा फवारणीला माझा विरोध नाही. मी तेच बोलतो की, दवा फवारणी होते. आणि आम्ही स्वतः करुन घेतो. पण त्या औषधात दम नाही. डॉ. बावसकर असतांना सुध्दा मी मा. आयुक्त साहेबांना बोललो की, दवा फवारणी करत नाही. अशातला भाग नाही. दवा फवारणी करतात पण त्या औषधांमध्ये बिलकुल दम नाही. हे तुम्हाला प्रत्येक वेळेला नजरेखाली आणुनसुध्दा त्याच्यावर कधी सुधारणा झाली नाही. आणि तुम्ही आम्हांला सांगतो की, याची चर्चा करुन

आम्हाला सांगा किती वेळा सांगत बसायचे? म्हणजे प्रत्येक वेळेला सांगायचे की, याला संस्पेड करा. त्याला सस्पेंड करा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महासभेने हा विषय होता.

**मिलन म्हात्रे :-**

मा. श्री. खतगांवकर साहेब, ज्या मच्छर चावतात त्यांची गांधी येतात. या कोणत्या नवीन मच्छर आल्या ते कळत नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, ज्या मच्छर लागु नये म्हणुन जी औषध फवारणी करतो ते किती ओरडले तरी त्या मच्छर लागणार आहेत. कारण औषधामध्ये दम नाही.

**शरद पाटील :-**

मी फवारणी होत नाही म्हणुन बोलणार नाही. फवारणी होते आम्ही स्वतः उभे राहुन करतो. आमचे कार्यकर्ते उभे राहुन करतात. पण त्या औषधामध्ये दम नाही. हे मी तुम्हाला ठामपणे सांगातो.

**मिलन म्हात्रे :-**

त्या ठेकेदाराला तुम्ही जे प्रमाण दिले आहे. माझ्याकडे सोसायटीत आला बघितले तर वास येत नाही. त्याला विचारले की, किती टाकले? तर तो म्हणाला की, एक झाकण टाकले त्याला म्हटले अजुन तीन झाकणे टाक. तर म्हणतो की ठेकेदाराने सांगितले की, एवढेच टाकायचे.

(सभागृहात गोंधळ.)

**नयना म्हात्रे :-**

साहेब तुम्ही त्या ठेकेदारांना बोलवा. एकोणऐंशी नगरसेवकांना माहिती करुन द्या. की, पाण्यामध्ये किती औषध टाकले पाहिजे?

**प्रशांत पालांडे :-**

मा. खतगांवकर साहेब, आपण जे औषध मिक्स करतो. त्याचे प्रमाण ठरले आहे का? किंवा त्याने किती मिक्स केले त्याचे टेस्टींग आपल्याकडे आहे का?

**शरद पाटील :-**

मा. श्री. शिवमुर्ती नाईक साहेब होते. त्यावेळेस बायर इंडियाने औषध मारले त्यावेळेला मी सांगत नाही. की, कम्लीट मच्छर गेली. पण ऐंशी टक्के फरक पडला होता.

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेला अनुभव आम्हाला निराळे होते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही मला एकच उत्तर द्या की, शेणावर मच्छर असते का?

**राजकुमार कांबळे :-**

शेण ओले असेल तर असते.

**मा. सभापती :-**

विषयाला धरुन बोला श्री व्हिलरचे काय झाले?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

श्री. कांबळे साहेब, त्याच्यावर काय ॲक्शन घेणार ते मला सांगा. तुम्ही आज घेणार.

**राजकुमार कांबळे :-**

उद्या मा. श्री. पानपट्टे साहेबांकडुन रिपोर्टींग करुन पुढची करावाई करु.

**शानु गोहिल :-**

श्री. कांबळे साहेब, आपने एस.आय को इन्स्ट्रक्शन दिजिए वो दोन-तीन महिने चेहरा दिखाते नही. फोन भी नही उठाते।

**राजकुमार कांबळे :-**

बरेच एस.आय तीन–चार वर्षापासुन एकाच ठिकाणी आहेत. काही दिवसातच आम्ही सगळ्यांच्या बदल करणार आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांच्या बदल्या करा आणि त्यांना सक्त सुचना द्या की, औषध फवारणी होते. त्याच्यावर त्यांना नियंत्रण ठेवायला सांगा. ज्याच्या ज्याच्या प्रभागात ज्यावेळेस फवासणी येते त्यावेळेस ते किती औषध टाकतात ते पाहण्यासाठी आपण एक जबाबदार माणुस त्याच्या मागे आपण लावायचा. म्हणजे ह्यांना गैरसोय व्हावी. आपण पैसे द्यावे. असे धोरण आपण ठेवायचे नाही.

**शानु गोहिल :-**

त्यांना आम्हाला भेटायला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

एक रजिस्टर ठेवा. सध्या घ्या. आम्ही रजिस्टर ठेवुन सह्या घेणार होतो की, नागरिकांकडे गाडी गेली की नाही.

**शानु गोहिल :-**

मा. सभापती साहेब मेरी एक माँग है की, हफ्ते मे एक बार जो दवाईया का छिडकाव होता है। या फॉगिग होता है। वो कम से कम दो या तीन मे एक बार होना चाहिऐ। उसके बाद आप टेम्पो खरिदो या घोडागाडी खरीदो, उससे हमे कोई लेना देना नही है। और दवाई असरदार होनी चाहिऐ।

**मा. सभापती :-**

आठवड्यातुन दोन दिवस औषध फवारणी करायला सांगतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

एस.आय ची बदली करा. एकाच ठिकाणी राहुन ते त्यांना आळशीपण आलेला आहे.

**राजकुमार कांबळे :-**

बदल्या आपण करणार आहोत.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, टेम्पोचे काय झाले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेबांचे असे म्हणणे आहे की, साहित्या पडुन आहे. तो खुलासा तुम्ही केला नाही.

**राजकुमार कांबळे :-**

सध्या चारही टेम्पो सुरु आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपण महत्वाची नवीन गाडी घेतली. प्रत्येकाकडे गाड्या आहेत. पहिली गोष्ट नवीन गाडी आल्यानंतर त्याचे उद्‌घाटन झाले. त्यांनतर ती गाडी खोलली गेली नाही पाहिजे. त्याच्यात काहीतरी फॉल्ट असेल म्हणुन खोलले आता आपण नवीन गाडी विकत घेतो ती गॅरेजला नेउन खोलतो का? सर्व्हिसींगला न्यायला आपण विचार करतो की, द्यावी का? आता मलासांगा मी स्वतः बघितले म्हणुन मी सांगतो तुम्ही प्रॅक्टीकल जेव्हा मारायला जाता. सगळे पाईप लिकेज आहेत. औषध सगळे त्या टेम्पोतुन खाली पडत असते. त्याच्या कॉन्प्रेसरचा व्हॅक्युम लुज होतो त्यामुळे तुमचा जो फवारा आहे. मा. आयुक्तांनी आम्हाला पाचशे मिटर सांगीतला म्हटले साहेब, तुमचे काहीतरी चुकते पाचशे मिटर म्हणजे पाच त्रिक पंधरा म्हणजे दिड हजार फुट झाले. तुमची शंभर फुट सुध्दा जात नाही. मी टेप लावुन मोजले. पंचवीस फुटाच्या अलिकडे तो फवारा आहे म्हणजे तुम्ही जे औषध टाकता त्याच्यामध्ये स्मेल तर आला पाहिजे. रोगर मारला तर झाडावर फवारला तरी वास एवढा येतो. तुम्ही जी औषधे मारता ती मी स्वतः मारुन घेतलेली आहेत. त्यामुळे औषधाचा प्रमाणकिती असल्यावर त्याचा स्मेल येतो. औषध बरोबर पडते की, नाही ते माहिती आहे. आता ते झाले मच्छरचे, मच्छीमार्केट मध्ये माशा आहेत. त्या खाद्यपदार्थांवर बसतात. आता सगळी रोगराई चालु आहे. माशा आहेत त्या स्पेशलिस्ट आहेत. तिकडे जाउन बघा. आपल्या पोलिस स्टेशनच्या समोर बघितले का? रात्री एक वाजेपर्यंत गर्दी असते. आमच्याकडे श्री. तेलंग वगैरे डॉक्टर आहेत. दोन्ही समोरा समोर डॉक्टर आहेत. एक वाजेपर्यंत गर्दी असते. मलेरिया, डेंग्युचे पेशंट कितीतरी आहेत. हॉस्पीटलला कितीतरी लोक आहेत. आता लहान मुलांमध्ये नाझरेथच्या दोन मुली ॲडमीट आहेत. त्यांना माहिती आहे का? त्यांना मी दोन दिवस देतो, त्यांनी फिगर द्यावा. किंवा मी हॉस्पीटल सह देतो त्यांनी सांगावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वाहने एकदा फायनल होउ द्या.

**मिलन म्हात्रे :-**

हे त्याच्याशी लींक आहे. या गोष्टी नये, साथीचे रोग होउ नये म्हणुन ते आणले वाहन येउन एक – दिड महिना व्हायला आला.

**शरद पाटील :-**

आपण वाहनाबद्दल बोलता. पण आपण ठेकेदाराला वाहने द्यायची आहेत का? आपण त्याला वाहने का देता?

**मिलन म्हात्रे :-**

आता जी बनवुन आणलेली आहेत त्याचे भाडे त्याच्याकडुन कापा.

**तुळशिदास म्हात्रे :-**

त्यांना वाहने द्या पण ड्रायव्हर आणि डिझेलचे जे पैसे लागतील ते त्यांच्याकडुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही भाडे ठरवुन त्यांच्याकडून घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याच्यामध्ये एक मुद्दा फायनल झाला. वाहन देण्याबद्दल हरकत नाही. पण याच्यामध्ये जो ऑपरेशन मेन्टोनन्सचा खर्च असतो तो ठेकेदाराकडे टाका. माहपिालकेकडे टाकु नका.

**शरद पाटील :-**

जो पाईप घेउन जातात. त्याला सिस्टम करायला लागेल. कारण, तो पाईप राउंड करावा लागेल. नाही तर त्यालाच सहा कामगार लागतात. एक गाठ सोडायला एक खेचायला.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. श्री. खतगांवकर साहेब ती सिस्टमसुध्दा त्यांना सांगितली वर कोणते क्लॅम्प घ्यायचे सोडल्यानंतर जसे फायर ब्रिगेडला रिव्हर्स खेचले जाते ती सिस्टम करा. त्याचा वेळेला त्यांना बोललो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पुल बॅक पुली असते. आपण पाईप ओढु शकतो आणि लुज सोडले तर मध्ये जातो.

**राजकुमार कांबळे :-**

आपण पहिला मुद्दा उपस्थित केला की, त्या दिवशी त्या मशिनरी ओपन केलेल्या वस्तुस्थिती अशी होती. कारण ती जी टेम्पो रिक्षा आपण ठाण्यावरुन घेतली होती आणि जी मशिनरी बसवली आहे ती ज्यांनी बसवली त्यांनी आणली होती. आणि नवीनच असल्यामुळे आणि त्याच मे कॅानिक इथे उपलब्ध नव्हती. त्यांनी भरपुर प्रयत्न केला की जी, पुली होती त्यातुन लिकेज वगैरे चालु झाले होते बऱ्याचे वेळा त्याचे प्रयत्न केले ते झाले नाही. शेवटी आम्ही त्या माणसाकडुन बोलावुन घेतले त्यामुळे ते एक दिवस उघडे होते. नंतर आम्ही त्याच्याकडुन करुन त्याचे एक्सट्रा पार्ट आपल्याकडे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे कोणी तयार केला?

**राजकुमार कांबळे :-**

गोरेगावला त्यांचा डिलर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपला माणुस तयार केला का?

**राजकुमार कांबळे :-**

आपला माणुस सुध्दा तयार आहे.

**शरद पाटील :-**

पाईपचा खर्च कोणाचा आहे?

**राजकुमार कांबळे :-**

पाईप थोडा जाड आहे. आणि आम्ही एकाला सांगितलेकी तो राउण्ड करायचा पण तो पाईप भरपुर जाडा आहे तो तुटण्याची शक्यता आहे.

**शरद पाटील :-**

पाईप तुटला वगैरे तर त्याचा खर्च कोणाचा आहे?

**राजकुमार कांबळे :-**

पाईप आपलाच आहे.

**शरद पाटील :-**

आपणच द्यायचा?

**राजकुमार कांबळै :-**

आता आपले ठरले की, जो मेन्टेनन्स खर्च होईल....

**मिलन म्हात्रे :-**

आपण हवा भरतो ते टायर धागेवाले पाईप असतात. ते फ्लेक्झीबल असतात. तुम्ही तो का घालता नाही? कारण हवेचे प्रेशर केवढे असेते. तरीसुध्दा त्या पाईपचा त्याच्यापेक्षा जास्त प्रेशर नाही.आणि तो बारीक राउण्ड होउन याचा मोठा गोल होतो. तेवढी जागा गाडीत नाही. मी प्रॅक्टीकल सगळे बघीतले. त्याला बोलतो, इकडे कृपया लाव इकडे व्हील लाव इथुन हे रिव्हर्स आले पाहिजे तुमचा त्रास कमी होईल पुढे काहीच नाही.

**राजकुमार कांबळे :-**

एका गॅरेजवाल्याला सांगितले आहे. काम सुरु आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, डेंग्युचे पेशन्ट किती आहेत?

**प्रकरण क्र. ०७ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या निविदांचे आवलोकन करणे (वाहन विभाग) महानगरपालिकेतील सार्व. आरोग्य विभागाकरिता पियागो ॲपे (डिझेल) थ्री हेम्पो आयटीपीवी पुरवठा करणे.

**ठराव क्र. ०४ :-**

महानगरपालिकेने दि. २६/९/२००७ रोजी दै.जनमत व दै.वार्ताहर या वृत्तपत्रात जाहिर केलेल्या निविदा सुचनेनुसार महानगरपालिकेतील सार्व.आरोग्य विभागाकरीता पियागो ॲपे (डिजेल) थ्री व्हीलर टेम्पो आयटीपीवी पुवरठा करणेकामी अपे कंपनीचे थ्री व्हिलरचे अधिकृत विक्रेते मे. पाप्युलर ऑटोमोटी व, मे.श्वेता मोटर्स, मे.दिप मोटर्स,मे.फोर्ट पॉईंट ऑटोमोटीव प्रा.लि. या चार ठेकेदारांनी निविदा सादर केलेल्या आहेत.

निविदेतील तुलनात्मक तक्ता पाहता पियागो ॲपे (डिझेल) थ्री व्हीलर टेम्पो या कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. फोर्ट पॉईंट ऑटोमोटीव प्रा.लि. यांचे प्रति टेम्पोचे दर रक्कम रु. १,२२,२५६/- सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे चार टेम्पो खरेदी करण्यात आले असुन झालेल्या खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (ड) अन्वये ही सभा अवलोकन करत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०८, मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे महानगरपालिका प्राथमिक शालेय विद्यार्थी वर्गाच्या घटक चाचणी सहामाही परिक्ष, वार्षिक प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तसेच इतर साहित्य छपाई करणे.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यात आमाउंट काय दिली आहे?

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर. काय चर्चा करायची आहे ती करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

अवलोकन दिले मान्य आहे. पण यांनी काय दिले आहे. अस्मिता आर्ट प्रिंटर सादर केलेले दर सर्वात कमी आहेत. किती रुपयाचा खर्च झाला. आम्ही कशाला अवलोकन द्यायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्या ज्या कॉन्ट्रॅक्टरला आपण शेवटी निविदा देतो. त्या निवीदाधारकांचे नंबर फोन नंबर पत्ता नाहितर एकाच माणसाच्या तीन निवीदा आल्या त्याला द्या त्या तीन निवीदांचे तुम्ही ॲड्रेस त्याच्यामध्ये द्या. त्याचा ॲड्रेस त्याचा सेल्स टॅक्स त्याचा इन्कम टॅक्स रिटर्न भरतो की, नाही.

**मिलन म्हात्रे :-**

कायद्याच्या तरतुदीनुसार मा. आयुक्तांनासुध्दा अवलोकन कराचे किती अधिकार आहेत ते आम्हाला माहिती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही पुर्ण माहिती द्या म्हणजे आम्ही पण सेल्स टॅक्समध्ये इन्कम टॅक्समध्ये करु की, हा फॉर्म आहे की नाही ही प्रथा सोडा. एकच माणुस चार टेंडर भरतो आणि घेउन जातो पुर्ण तपशिल द्या. ते आम्ही सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्समध्ये जाउ की, हा फॉर्म तुमच्याकडे आहे की, नाही? रजिस्टर आहे की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

याच्यावर काही फिगर नाही. तुम्ही कशाला मंजुरी देतो? मा. आयुक्तांनी काय केले? किती कामाला किती रुपयाची मंजुरी दिली हे सुध्दा याच्यात नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या प्रश्नपत्रिका आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

काय अमाउंट आहे की, नाही एक करोडची आणतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सहामाही साठी दोन लाख आणि चाचणी साठी एक लाख.

**मिलन म्हात्रे :-**

असे द्या.

**प्रकरण क्र. ८ :-**

मा. आयुक्त सो., यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) महानगरपालिका प्राथमिक शालेय विद्यार्थी वर्गाच्या घटक चाचणी, सहामायी परिक्षा, वार्षिक परिक्षेच्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तसेच इतर साहित्य छपाई करणे.

**ठराव क्र. ०५ :-**

महानगरपालिका प्राथमिक शालेय विद्यार्थी वर्गाच्या घटक चाचणी, सहामाही परिक्षा, वार्षिक परिक्षेच्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तसेच इतर साहित्य छपाई करणेकामी दि. ११-०९-२००७ दै. मुंबई लक्षदिप या वृत्तपत्रात पुरवठा केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील संबंधित ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. शकुन प्रिंटींग प्रेस | मे. चंडिका प्रिंटर्स | मे. अस्मिता आर्ट प्रिंटर्स |
|---|---|---|---|---|
| १) | इ. १ ली ते ७ वी प्रश्नपत्रिका (पाठपोठ) प्रति पेज (मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु) | ए-४ साईज रु. १.९५/- प्र. पेज | ए-४ साईज रु. १.९०/- प्र. पेज | **ए-४ साईज रु. १.८५/- प्र. पेज** |
| २) | उत्तरपत्रिका १२ पानी (पाठपोठ) | रु. २१०/- प्र. शेकडा | रु. १९०/- प्र. शेकडा | **रु. १८५/- प्र. शेकडा** |
| ३) | पुरवण्या, उत्तरपत्रिका (४ पानी) | रु. ७९/- प्र. शेकडा | रु. ६९/- प्र. शेकडा | **रु. ६०/- प्र. शेकडा** |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. अस्मिता आर्ट प्रिंटर्स यांनी सादर केलेले दर सर्वांत कमी आहेत. सर्वांत कमी दराची निविदा मा. आयुक्त साो. यांच्या मान्यतेने स्विकारण्यात आलेली आहे. त्याकामी वेळोवेळी देयक अदा करण्यास मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम खंड ७ (ड) अन्वये अवलोकन करण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०५ चा ठराव बाकी होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो तयार करुन ठराव आणला आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, आपल्या शाळेच्या परिक्षेचा विषय आला. तर आपल्या मिरा गांव शाळेमध्ये त्या शिक्षकांनी बारावी पास, दहावी पास अशा दुसऱ्या शिक्षीका ठेवल्या आहेत. त्यांना बाराशे किंवा हजार रुपये पगार देउन त्या शिकवतात. आणि या आराम करतात. तर हा विषय निघाला म्हणुन मी तुम्हाला सांगते. की, मिरा गावामध्ये असा प्रकार चाललेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

माझ्या गावामध्ये सुध्दा तसेच चालले आहे.

**मा. सभापती :-**

केलेल्या सुचनेला अधिन राहुन प्रकरण क्र. ०६,०७ आणि ०८ च्या अवलोकनाच्या ठरावाला केलेल्या सुचनांसह मी मंजुरी देत आहे. प्रकरण क्र. ०५ चा ठराव वाचा प्रकरण ०५ पुन्हा मागवुन घ्यावात. ठराव फेटाळला.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती सहोब, आपण ठराव कुठे केला? तुम्ही गोषवारा फेटाळता की ठराव फेटाळता?

**मा. सभापती :-**

आपल्याकडे अमाउंट डिक्लेअर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ठाराव झालाच नाही मग ठराव कसा फेटाळणार? तुमच्याकडे तो गोषवारा आला आहे. प्रकरण क्र. ०५ नुसार आलेला गोषवारा सदोष असल्याने आम्ही फेटाळत आहेत. असे तुमचे रुलिंग आले पाहीजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कामकाजामध्ये यापुर्वी चर्चा होवुन त्यातील पंधरापैकी पाच गाड्या कमी करुन टोटल खर्च तीन लाखाचा होता. आपण फक्त तो ठराव रिप्रीन्ट करायला पाठवला होता आणि तो सर्वानुमते मंजुर केला होता.

**मिलन म्हात्रे :-**

मग तसे रुलिंग होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

फक्त अंतिम करायचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग नेमका तुम्ही काय निर्णय घेता ते सांगा.

**शरद पाटील :-**

ते सुधारीत येउ द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

याची डिटेल घेउन पुढच्या बैठकीत सादर करतो.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ०५ चा गोषवारा पुढच्या सभेत सादर करा.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, हा विषय विषयपत्रिकेवर नाही तरीसुध्दा मी बोलते. कारण आत्ता आपले मा. आयुक्त साहेब चालले. आपण १७० लोकांना कामावर घेणार होतो. १० हजार मुलांचे इंटरव्ह्यु आपण घेतलेले आहे. तर एखाद्या वेळेला असे व्हायला नको की, जात जाता मा. आयुक्त साहेब सह्या करतील आणि १७० लोकांना कामाला लावतील आणि मग लोकांना आपल्याला जवाब द्यावा लागेल. असे होता कामा नये.

**मा. सभापती :-**

मा. महासभेत तो विषय झाला.

**नयना म्हात्रे :-**

मा. महासभेत १७० जणांचा विषय आलाच नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सदरची भरती रद्द करण्यात येत आहे. मा. महासभेतसुध्दा यावर खुप चर्चा झालेली आहे. आस्थापना खर्च वाढतो म्हणून सर्वांचे आक्षेप आहेत. परस्पर कोणते आदेश दिले जाणार नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

म्हणून कधी अशी जाहिरात देउ नका आणि मुलांचा वेळ वाया घालवू नका.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

महामानव डॉ. बाबसाहेब यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज आपल्या सर्वांच्या वतीने कोटी - कोटी अभिवादन करण्यात येत आहे.

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सदस्या, उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्ग आजची सभा खेळीमेळीच्या वातावरएाात पार पाडली याबद्दल धन्यवाद देउन आजची सभा संपली असे जाहिर करतो. आपली दुसरी मिटींग दर गुरुवारी घेण्यात येईल.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०२.५० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**